○ दि. १२ फेब्रुवारी २०२६
○ गुरुवार
○ वर्ष ४ थे
○ अंक १००
○ किंमत २ रूपये
○ पृष्ठे ४
○ लातूर
○ RNINO.MHMAR/25/A1409

# दैनिक अदिती एक्सप्रेस

संपादक - गंगाधर अभंग डिगोळे    उपसंपादक : डॉ. ज्ञानेश्वर विठ्ठल कल्याणे

ईमेल-aditiexpress33@gmail.com, **Website: www.aditiexpress.in**

### आजचे पंचाग

○ दिनांक : १२ फेब्रुवारी २०२६
○ वार : गुरुवार
○ माह (अमावस्यांत) : माघ
○ माह (पूर्णिमांत) : फाल्गुन
○ ऋतु : शिशिर
○ आयन : उत्तरायण
○ पक्ष : कृष्ण पक्ष
○ तिथी : दशमी तिथी (दुपारी १२:२२ पर्यंत) त्यानंतर एकादशी तिथी
○ नक्षत्र : ज्येष्ठा नक्षत्र (दुपारी ०१:४१ पर्यंत) त्यानंतर मूळ नक्षत्र
○ योग : हर्षण योग (१३ फेब्रुवारी पहाटे ०३:०५ पर्यंत) त्यानंतर वज्र योग
○ करण : विस्ती भद्रा करण (दुपारी १२:२२ पर्यंत) त्यानंतर भाव करण
○ चंद्र राशी : वृश्चिक राशी (दुपारी ०१:४१ पर्यंत) त्यानंतर धनु राशी
○ सूर्य राशी : मकर राशी (१३ फेब्रुवारी पहाटे ०४:०७ पर्यंत) कुंभ राशी
○ अशुभ मुहूर्त:
○ राहु काळ : दुपारी ०२:१९ ते दुपारी ०३:४४ पर्यंत
○ शुभ मुहूर्त:
○ अभिजित : दुपारी १२:३० ते दुपारी ०१:१६
○ सूर्योदय : सकाळी ०७:१०
○ सूर्यास्त : सायंकाळी ०६:३६
○ संवत्सर : विश्वावसु
○ संवत्सर(उत्तर) : सिद्धार्थी
○ विक्रम संवत: २०८२ विक्रम संवत
○ शक संवत: १९४७ शक संवत

# मुंबईवर भाजपाचा महापौर विराजमान

## मुंबईच्या महापौरपदी रितू तावडे, उपमहापौर पदी संजय घाडी

मुंबई : अवघ्या महाराष्ट्राचे लक्ष लागून राहिलेल्या मुंबई महानगरपालिकेच्या सर्वोच्च पदी अखेर भाजपच्या रितू तावडे विराजमान झाल्या आहेत. आज त्यांनी पालिकेच्या महापौर पदाचा अधिकृत कार्यभार स्वीकारला. त्याच्यासोबतच शिवसेनेचे (शिंदे गट) संजय घाडी यांनीही उपमहापौर म्हणून आपल्या पदाची सूत्रे हाती घेतली. पालिका आयुक्त भूषण गगराणी यांनी दोन्ही नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे स्वागत करत त्यांच्याकडे कार्यभार सोपवला.



महापालिका सभागृहात सत्ताधारी आणि विरोधकांच्या जोरदार घोषणाबाजीने वातावरण तापलेले असतानाच हा पदग्रहण सोहळा पार पडला. या ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार होण्यासाठी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्वतः उपस्थिती लावली होती. महायुतीच्या नेत्यांनी रितू तावडे आणि संजय घाडी यांचे अभिनंदन करत आगामी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

पदभार स्वीकारल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माध्यमांशी संवाद साधला. ते म्हणाले, नवनियुक्त महापौर, उपमहापौर आणि सर्व पदाधिकारी मिळून मुंबई महापालिकेला एक नवी प्रगतीशील दिशा देतील. सामान्य मुंबईकरांनी जे विश्वासाने महायुतीला निवडून दिले आहे, त्यांची सर्व स्वप्ने पूर्ण करण्याचे काम ही नवी टीम करेल, असा आम्हाला ठाम विश्वास आहे. महापौर रितू तावडे यांच्या रूपाने मुंबईला एक अनुभवी आणि अस्सल मराठी चेहरा मिळाला आहे, अशा शब्दांत मुख्यमंत्र्यांनी त्यांच्या निवडीचे स्वागत केले. शिवसेना-भाजप महायुतीचे हे यश मुंबईकरांनी दाखवलेल्या विश्वासाचे प्रतीक असल्याचेही त्यांनी यावेळी नमूद केले. पदग्रहण सोहळ्यानंतर माध्यमांशी बोलताना मुख्यमंत्री म्हणाले की, निवडणूक काळात मी आणि एकनाथ शिंदे यांनी मुंबईकरांकडे 'लोकाभिमुख' आणि 'पारदर्शी' **(पान २ वर)**

# अजित पवारांच्या मृत्यूचे राजकारण करू नका - मुख्यमंत्र्यांचा सल्ला

## कोणाकडे पुरावे असतील तर त्यांनी तपास यंत्रणांकडे द्यावेत

मुंबई : दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनाबाबत तर्कवितर्क न लढवता, सखोल चौकशी पूर्ण होऊ द्यावी. कोणीही या दुर्दैवी घटनेचे राजकारण करू नये, असे मत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी व्यक्त केले. या अपघाताबाबत कोणाकडे काही पुरावे किंवा मुद्दे असतील, तर त्यांनी ते संबंधित तपास यंत्रणांकडे सादर करावेत, असेही त्यांनी नमूद केले.



मुंबई महापालिका मुख्यालयाबाहेर माध्यमांशी संवाद साधताना ते बोलत होते. अजित पवार यांच्या अपघाती निधनाबाबत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी व्यक्त केलेल्या संशयावर मुख्यमंत्र्यांनी भाष्य केले. ते म्हणाले, रोहित पवार यांनी काय वक्तव्य केले, हे मी थेट ऐकले नसले तरी त्यांनी काही प्रेझेंटेशन केले असल्याची माहिती आहे. विविध माध्यमे व नागरिकांनी उपस्थित केलेल्या शंकाच त्यांनी मांडल्या असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले.

अजित पवार हे महाराष्ट्राचे लाडके व वरिष्ठ नेतृत्व होते. त्यामुळे त्यांच्या अपघाताची पूर्ण, सखोल व निष्पक्ष चौकशी झाली पाहिजे, ही मागणी रास्त असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले. मीच सर्वप्रथम केंद्र सरकारला पत्र लिहून योग्य चौकशीची मागणी केली होती. केंद्रीय नागरी उड्डाण मंत्र्यांनी विशेष चौकशी समिती स्थापन केल्याचे पत्रही पाठवले असून सध्या तपास सुरू आहे, अशी माहिती त्यांनी दिली.

चौकशी पूर्ण होण्यापूर्वी तर्कवितर्क मांडल्यास लोकांमध्ये संभ्रम निर्माण होऊ शकतो, असे सांगत त्यांनी भारतीय तपास यंत्रणांवर अविश्वास दाखवू नये, असे आवाहन केले. देशातील डीजी एव्हिएशन सेफ्टी हे सर्वोच्च कार्यालय असून आतापर्यंतच्या सर्व विमान अपघातांची चौकशी त्यांनीच केली आहे. याशिवाय सीआयडीचा समांतर तपास सुरू असून डीजीसीएचीही चौकशी सुरू आहे. अपघातग्रस्त विमानातील ब्लॅकबॉक्स सापडला आहे. शिवाय विमानाचे आवश्यक भाग जप्त करण्यात आले असून पायलट व एटीसीमधील संवाद डिजिटाईज स्वरूपात उपलब्ध आहे. **(पान २ वर)**

# राज ठाकरे पंतप्रधान नरेंद्र मोदींना घाबरले; माजी राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांचा टोला

मुंबई : राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी मुंबईत केलेल्या उद्बोधनावर राज ठाकरे यांनी टीका केली. त्यानंतर भाजपसह संघ वर्तुळातून राज यांच्या विधानाचा कठोर शब्दांत समाचार घेतला जात आहे. महाराष्ट्राचे माजी राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी देखील राज यांच्या विधानाचा खरपूस समाचार घेत, सरसंघचालकांच्या उद्बोधनाला आलेले मान्यवर नव्हे, तर राज ठाकरेच नरेंद्र मोदींना जास्त घाबरत आहेत, असा टोला लगावला.



राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या मुंबईतील कार्यक्रमात सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी संघाची भूमिका, कार्यपद्धती आणि समाजातील योगदान याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाला विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित मंडळी उपस्थित होती. त्यामुळे या कार्यक्रमाची देशभरात चर्चा झाली. या कार्यक्रमानंतर मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी सोशल मीडियावर लांबलचक पोस्ट लिहून टीका केली. कार्यक्रमाला आलेली मंडळी संघप्रेमापोटी नव्हती, तर सरकारच्या दबावामुळे किंवा भीतीमुळे आली होती, असा आरोप त्यांनी केला. यापूर्वी अशा कार्यक्रमांना कोणी का उपस्थित राहिले नव्हते, असा सवाल उपस्थित करत ही उपस्थिती संघासाठी नसून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या भीतीपोटी असल्याचे त्यांनी म्हटले.

राज ठाकरे यांच्या या भूमिकेवर भगतसिंह कोश्यारी यांनी तिखट प्रतिक्रिया दिली. संघाच्या कार्यक्रमाला लोक मोदींना घाबरून आले नव्हते. उलट राज ठाकरेच नरेंद्र मोदींना जास्त घाबरत असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. राज ठाकरे यांनी मोदींना घाबरू नये, तर त्यांच्या जवळ जावे, असा सल्लाही त्यांनी दिला. मोदींसाठी सर्व जनता समान आहे,

**(पान २ वर)**

# शिवसेनेच्या खासदारांनी घेतली भाजपा राष्ट्रीय अध्यक्ष नितिन नवीन यांची भेट



नवी दिल्ली : भारतीय जनता पार्टीचे नवनियुक्त राष्ट्रीय अध्यक्ष नितिन नवीन यांची आज दिल्लीत भाजपच्या राष्ट्रीय कार्यालयात शिवसेना संसदीय गटनेते खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेच्या खासदारांनी भेट देत शुभेच्छा दिल्या.

यावेळी केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव, शिवसेना मुख्य प्रवक्ते खासदार नरेश म्हस्के, खासदार रवींद्र वायकर, खासदार संदीपान भुमरे, खासदार मिलिंद देवरा, प्रवक्त्या शायना एनसी हे मान्यवर यावेळी उपस्थित होते.

भेटी दरम्यान संसदेमध्ये सुरु असलेले अधिवेशन आणि केंद्रीय अर्थसंकल्पात महाराष्ट्रातील स्थिती या विषयी सविस्तर चर्चा करण्यात आली. नितिन नवीन यांनी यावेळी एनडीएचे घटक पक्ष म्हणून नेहमी शिवसेनेच्या पाठिशी खंबिर उभे राहण्याचा शब्द शिवसेनेच्या सर्व खासदारांना दिला.

## शरद पवारांना पुढील २ दिवसांत डिस्चार्ज देणार; डॉक्टरांची माहिती



पुणे : राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शरद पवार यांची प्रकृती स्थिर असून त्यांच्यात सातत्याने सुधारणा होत आहे. त्यांचे सर्व जीवनावश्यक घटक (वायटल पॅरामीटर्स) सामान्य मर्यादेत असून त्यांची एकूण क्लिनिकल स्थिती स्थिर आणि दिलासादायक असल्याची माहिती रुबी हॉल क्लिनिकचे फिजिशियन आणि विश्वस्त डॉ. सायमन ग्रँट यांनी दिली आहे.

रुग्णालयात दाखल होताना आढळलेली छातीतील कोंजेशन (कफ साचणे) उपचारांना अत्यंत चांगला प्रतिसाद देत असून प्रकृतीत सुरळीत सुधारणा होत आहे. अलीकडील व्यापक दौरे, प्रवास आणि वारंवार होणाऱ्या सार्वजनिक भेटीगाठींमुळे आलेला शारीरिक ताण व थकवा हे या त्रासाचे मुख्य कारण असल्याचे त्यांनी नमूद केले आहे. वैद्यकीय देखरेखीखाली पवार यांच्या प्रकृतीत सातत्याने सुधारणा होत आहे. सध्याच्या प्रगतीचा आढावा घेत, पुढील दोन दिवसांत त्यांना रुग्णालयातून **(पान २ वर)**

# जि. प. व पं. स.च्या काँग्रेस सदस्यांना माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांनी दिल्या शुभेच्छा



लातूर : प्रतिनिधी- नुकत्याच झालेल्या लातूर जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या निवडणुकीत काँग्रेस पक्षाने दमदार विजय मिळवत सर्वात मोठा पक्ष म्हणून जिल्हा परिषदमध्ये ठरलेला. जिल्ह्यातील सर्व नूतन जिल्हा परिषद, पंचायत समिती सदस्य, काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी मंगळवारी आशियाना निवासस्थानी राज्याचे माजी मंत्री, सहकार महर्षी दिलीपराव देशमुख यांची भेट घेऊन त्यांचे आशीर्वाद घेतले. त्यावेळी माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांनी सर्व नूतन सदस्यांचे अभिनंदन करत त्यांना पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या. जिल्ह्यातील सर्व मतदार, कार्यकर्ते, पदाधिकारी यांचे आभार व्यक्त केले. दरम्यान सकाळपासून आशियाना निवासस्थानी जिल्ह्यातील काँग्रेस पदाधिकारी कार्यकर्ते नवनिर्वाचित सदस्यांनी आनंद साजरा करत आशियाना निवासस्थान गर्दीने खचाखच भरलेले दिसत होते.

यावेळी माजी आमदार, लातूर जिल्हा बँकेचे चेअरमन धिरज विलासराव देशमुख, माजी आमदार तथा विलास साखर कारखान्याचे उपाध्यक्ष वैजनाथ शिंदे, जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष अभय साळुंके, विकासरत्न विलासराव देशमुख मांजरा शेतकरी सहकारी **(पान २ वर)**

# सिंहस्थाच्या पार्श्वभूमीवर नाशिकच्या जिल्हा वार्षिक योजनेसाठी निधी वाढवून मिळावा

## मंत्री छगन भुजबळ यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

मुंबई: जिल्हा वार्षिक सर्वसाधारण योजना सन २०२५-२६ साठी ९०० कोटी रुपयांची तरतूद होती. सन २०२६ - २७ साठी ही ६९१.९० कोटी रुपये मर्यादा शासनाने कळवली आहे. म्हणजे पुढील वर्षासाठी २०९ कोटी नियतव्यय कमी करण्यात येणार आहे. मात्र आगामी कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर नाशिक जिल्ह्याचा निधी कमी करू नये, शासकीय यंत्रणांकडून अधिक ६४२ कोटी इतकी वाढीव निधीची मागणी आहे.



त्यानुसार ६९१.९० अधिक ६४२ अशी एकूण १३३३.९० कोटी इतकी तरतूद करण्यात यावी, अशी मागणी राज्याचे अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी केली आहे.

जिल्हा वार्षिक योजना सन २०२६-२७ चे प्रारूप आराखडे अंतिम करण्यासाठी राज्याचे मुख्यमंत्री तथा मंत्री, वित्त व नियोजन, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली वर्षा निवासस्थान येथे नाशिक जिल्ह्याची ऑनलाइन पद्धतीने बैठक पार पडली. या बैठकीस मंत्री छगन भुजबळ, शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे ही उपस्थित होते. या बैठकीत त्यांनी मागणी केली. **(पान २ वर)**

# सन २०२६-२७ साठी जिल्हा वार्षिक योजनेचा ५११ कोटींचा प्रारूप आराखडा मंजूर

## विहित कालावधीत निधी खर्चासाठी नियोजनबद्ध काम करा- पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले

लातूर, दि. ११ : जिल्हा वार्षिक योजनेतून प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली कामे विहित कालावधीत पूर्ण होण्यासाठी सर्व कार्यान्वयीन यंत्रणांनी नियोजनबद्ध काम करावे. कोणत्याही स्थितीत निधी अखर्चित राहणार नाही, याची दक्षता घ्यावी. यासोबतच प्रत्येक काम गुणवत्तापूर्ण आणि दर्जेदार होईल, याची काळजी घ्यावी, अशा सूचना राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी आज येथे दिल्या. जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये आयोजित जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत ते बोलत होते.




आमदार विक्रम काळे, आमदार अमित विलासराव देशमुख, आमदार संभाजी पाटील निलंगेकर, आमदार संजय बनसोडे, आमदार अभिमन्यू पवार, आमदार रमेश कराड, जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीना, पोलीस अधीक्षक अमोल तांबे, लातूर शहर महानगरपालिका आयुक्त श्रीमती मानसी यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. तसेच सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, खासदार डॉ. शिवाजी काळगे हे दूरदृश्य प्रणालीद्वारे या बैठकीमध्ये सहभागी झाले होते.

नागरिकांना चांगल्या सुविधा मिळण्यासाठी जिल्हा वार्षिक योजनेतून प्रस्तावित कामे विहित कालावधीत पूर्ण होणे गरजेचे आहे. या कामांमध्ये गुणवत्तेच्या बाबतीत कोणतीही तडजोड किंवा हयगय होणार नाही, याची दक्षता संबंधित शासकीय यंत्रणा प्रमुखांनी घ्यावी, असे पालकमंत्री श्री. भोसले म्हणाले. तसेच कंत्राटदारांकडून मुदतीत कामे पूर्ण केली जात नसल्यास त्यांच्यावर संबंधित विभागाने कठोर कार्यवाही करावी. एखादा कंत्राटदार मुदत संपूनही काम पूर्ण अथवा सुरु करत नसेल तर असे काम विहित मार्गाने इतर कंत्राटदाराला देवून लवकरात लवकर पूर्ण करून घ्यावे. विनाकारण विलंब करणाऱ्या कंत्राटदारांना पुन्हा जिल्ह्यात नवीन काम देवू नये, अशा सूचना पालकमंत्र्यांनी यावेळी दिल्या.

लातूर शहरातील वाहतूक कोंडीचा प्रश्न निकाली काढण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराज चौक, स्व. विलासराव देशमुख मार्ग आणि बाह्यवळण रस्त्याच्या कामाला गती द्यावी. छत्रपती संभाजीनगर येथील क्रांती चौकाच्या धर्तीवर लातूर शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकातील रस्ते, उड्डाणपुलाचे काम करण्यासाठी प्रारूप आराखडा तयार करावा. या आराखड्याचे संबंधित लोकप्रतिनिधींसमोर सादरीकरण करून त्यांच्याही सूचना घ्याव्यात, असे पालकमंत्री म्हणाले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केल्यानुसार भारतरत्न डॉ. बाबासाहेब **(पान २ वर)**



# लातूर काँग्रेसचाच अभेद्य गड जनतेचा विश्वास सार्थ करण्यासाठी आम्ही कटिबद्ध : आमदार अमित देशमुख

लातूर - लातूर जिल्हा परिषद निवडणुकीत काँग्रेस पक्षाने २३ जागांसह सर्वाधिक यश मिळवून हे सिद्ध केले आहे की, हा जिल्हा पूर्वीपासूनच काँग्रेसचा बालेकिल्ला होता आणि आजही तो अभेद्य आहे. लातूरच्या जनतेने जो भरघोस पाठिंबा आणि आशीर्वाद दिला आहे, तो विश्वास सार्थ ठरवण्यासाठी मी आणि माझे सर्व सहकारी अहोरात्र प्रयत्नशील राहू, अशा शब्दांत माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी मतदारांप्रती कृतज्ञता व्यक्त केली.

आज मंगळवारी सकाळी बाभळगाव निवासस्थानी विजयाचा मोठा उत्साह पाहायला मिळाला. जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीत विजयी झालेल्या उमेदवारांनी आमदार देशमुखांची भेट घेऊन शुभेच्छा स्विकारल्या. निवडणुकीच्या निकालानंतर आज आमदार अमित देशमुख यांनी नवनियुक्त सदस्यांशी संवाद साधला जळकोट, औसा, निलंगा, लातूर आणि उदगीर तालुक्यासह जिल्हयातील काँग्रेस आघाडीचे विजयी उमेदवारांनी आमदार अमित देशमुख यांची भेट घेतली यावेळी सर्वांचे अभिनंदन करुन पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या, उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांचे कौतुक करुन मतदारांचे विशेष आभार मानले.

# उत्क्रांतीवादाचा जनक : चार्ल्स डार्विन

उत्क्रांती वादाचा जनक असे ज्यांना समजले जाते त्या चार्ल्स रॉबर्ट डार्विन यांचा आज जन्मदिन. चार्ल्स डार्विन हे विख्यात जीवशास्त्रज्ञ होते. त्यांनी मांडलेल्या उत्क्रांतीवादाच्या सिद्धांतात जगातील जीवसृष्टीची उत्पत्ती व विकासाची कशी प्रगती होत गेली हे शास्त्रशुद्धरित्या उलगडून दाखवले. चार्ल्स डार्विन यांचा जन्म १२ फेब्रुवारी १८०९ रोजी इंग्लंडमधील श्रॉपशायर परगण्यात झाला.त्यांचे वडील रॉबर्ट डॉक्टर तर आजोबा इमर्सन शास्त्रज्ञ होते. शालेय जीवनात त्यांना रसायन शास्त्राची खूप आवड होती म्हणून आपल्या भावाच्या मदतीने त्यांनी आपल्या घराबाहेर एक छोटीशी प्रयोगशाळा उभारली होती तिथे ते तासनतास प्रयोग करीत बसत. ते असे एकाच जागेवर तासनतास प्रयोग करीत बसत असल्याने मित्र मंडळी त्यांची नेहमी टर उडवत पण ते त्याकडे कायम दुर्लक्ष करीत. त्यांना निसर्गाचीही खूप आवड होती. पुढे त्यांची डॉ ग्रांट यांच्याशी ओळख झाली. डॉ ग्रांट हे स्वतः प्रसिद्ध जीव शास्त्रज्ञ होते. १८२५ मध्ये डार्विन यांनी केंब्रिज विद्यापीठाच्या क्राईस्ट महाविद्यालयात नाव नोंदवून पदवी मिळवली. तिथे त्यांना कीटक व निसर्गातील जीव जिवाणूंच्या निरीक्षणाचा नाद लागला. १८२६ मध्ये कॅप्टन किंगने दक्षिण अमेरिका संशोधनाची मोहीम आखली त्यात ते सहभागी झाले. त्या मोहिमेवर ते पाच वर्ष होते. तिथे त्यांनी निरनिराळे पक्षी, प्राणी, कीटक, जीवजंतू एकमेकांशी कसे वागतात. ते एकमेकांशी आणि निसर्गाशी कसे जुळवून घेतात याचे निरीक्षण व अभ्यास केला व तेथे उत्क्रांतीवाद, सहजीवन, बळी तो कान पिळी ही मूलभूत नैसर्गिक तत्वे ते शिकले. याच दरम्यान माणसाचा मूळ पुरुष, चार पायी माकडपासून झाला असला पाहिजे असा विचार त्यांच्या डोक्यात घुमू लागला. त्यांनी याचे खूप संशोधन केले. वेगवेगळे प्राणी कसे निर्माण झाले यासंदर्भातही त्यांनी खूप संशोधन केले. या संशोधनावर आधारित ओरिजन ऑफ स्पेसिस हा ग्रंथ त्यांनी लिहिला. या ग्रंथातच त्यांनी उत्क्रांतवादाचा सिद्धांत मांडला आहे. या ग्रंथाच्या १२५० प्रति एकाच दिवसात विकल्या गेल्या. या ग्रंथामुळे त्यांचे सर्वत्र त्यांचे नाव झाले. या ग्रंथात त्यांनी मांडलेला उत्क्रांतीवादाचा सिध्दांत बायबलच्या विरुद्ध जात होता म्हणून अनेकांनी या सिद्धांताला विरोध केला. हा सिद्धांत बायबलच्या विरुद्ध जातो म्हणून त्याचा निषेध करण्यासाठी १८६० मध्ये ऑक्सफर्डमध्ये विलबर फोर्स या बिशपने सभा बोलावली. डार्विन यांचा एकीकडे पुरोगामी विचारांचे लोक समर्थन करीत होते दुसरीकडे प्रतिगामी लोक विरोध करीत होते. पण या सर्व घडामोडींचा डार्विन यांच्यावर कोणताही परिणाम होत नव्हता त्यांचे संशोधन चालूच होते. बिशप डार्विनला कडाडून विरोध करीत असताना हक्सले डी हुकर हे शास्त्रज्ञ मात्र डार्विन यांची बाजू सडेतोड व सोदाहरण मांडत होते. त्यामुळे उत्क्रांतीवादाच्या सिद्धांताला कडाडून विरोध करणाऱ्या बिशपला अखेर माघार घेऊन डार्विनचा सिद्धांत मान्य करावाच लागला.

# गांधी पर्याय नसून शाश्वत उपचार : किशोर बेळेकर



लातूर : पैशाच्या आधारे चालणाऱ्या जगात मानवी मूल्यांची होत चाललेली झीज अधोरेखित करणारा प्रभावी मूक व्यंगचित्रपट 'गांधी टॉक्स' हा केवळ महात्मा गांधींच्या तत्त्वज्ञानापुरता मर्यादित न राहता, आजच्या समाजात 'गांधी' या नावाचा नेमका अर्थ काय आहे, असा विचार मांडतो, असे दिग्दर्शक किशोर पांडुरंग बेळेकर यांनी लातूर येथे माध्यमांशी संवाद साधताना सांगितले.

अभिजात फिल्म सोसायटी, लातूर यांच्या वतीने 'गांधी टॉक्स' चित्रपटाच्या विशेष शोचे आयोजन करण्यात आले होते. चित्रपटाची संकल्पना स्पष्ट करताना बेळेकर म्हणाले की 'गांधी' हा शब्द दोन भिन्न अर्थांनी वापरला जातोएक म्हणजे सत्य आणि नैतिक मूल्यांचे प्रतीक, तर दुसरा आधुनिक जीवनातील पैसा आणि सत्तेच्या वर्चस्वाचे रूपक. मूकता, प्रतीकात्मकता आणि दृश्यप्रधान कथनशैलीच्या माध्यमातून भौतिकतावादाने मानवी भावना व मूल्ये कशी झाकोळली आहेत, हे या चित्रपटात प्रभावी सामाजिक व्यंगातून मांडले आहे, भारतात पहिला चित्रपट जो बनवला गेला राजा हरिश्चंद्र तो एक मूकपट होता आणि तो एका मराठी माणसाने अर्थात दादासाहेब फाळकेंनी बनवला आणि तेव्हापासून चित्रपट निर्मितीची सुरुवात झाली, या गोष्टीला १०० वर्षे पूर्ण झाली, १०० वर्षांनंतर ही गोष्ट अभिमानाने साजरी करताना बनवण्यात येणारा चित्रपटही मूकपट असावा आणि ही भावना मनात ठेऊन हा चित्रपट विना संवादच असावा अस मी ठरवलं आणि मी त्यावर काम केल, योगायोगाने मी पण मराठीच आहे.

'पुष्पक' नंतर जवळपास ४० वर्षांनंतर प्रदर्शित झालेला हा मूक चित्रपट असून, त्याच्या संकल्पना आणि कथेसाठी जवळपास २५ वर्षे परिश्रम घेतल्याचे बेळेकर यांनी सांगितले. संवादांशिवाय केवळ दृश्यरचना, पार्श्वसंगीत आणि कलाकारांच्या अभिनयाच्या आधारे भावना, संघर्ष आणि विचार व्यक्त करणे हे मोठे सर्जनशील आव्हान असल्याचे त्यांनी नमूद केले.

या चित्रपटाचे संगीत ए. आर. रहमान यांनी दिले असून, मूक चित्रपटाला भावनिक आवाज देण्याचे श्रेय त्यांनी रहमान यांना दिले. मूक चित्रपटात संगीतच संवादाचे काम करते. ते प्रेक्षकांना कथानकातून मार्गदर्शन करते आणि प्रत्येक भावनेला अधिक प्रभावी बनवते, असे ते म्हणाले.

सध्या चित्रपटगृहांत प्रदर्शित होत असलेला 'गांधी टॉक्स' लवकरच मराठी आवृत्तीतही प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. अनुभवी कलाकारांच्या प्रभावी अभिनयावर आधारित हा चित्रपट चेहऱ्यावरील भाव, देहबोली आणि पडद्यावरील उपस्थितीच्या माध्यमातून कथा सांगत प्रेक्षकांना अंतर्मुख होण्यास प्रवृत्त करतो, या चित्रपटात साऊथचा सुपरस्टार विजय सेतुपती, अरविंद स्वामी, बॉलिवूड अभिनेत्री आदिती राव हैदरी, मराठीतील सुप्रसिद्ध अभिनेते सिद्धार्थ जाधव, महेश मांजरेकर, ज्येष्ठ अभिनेत्री उषा नाडकर्णी, प्रियदर्शनी इंदलकर, वनिता खरात आदी दिग्गज कलाकारांच्या भूमिका असून हा चित्रपट मराठीसह ५ भाषांमध्ये प्रदर्शित करण्यात आला आहे.

या पत्रकार परिषदेला अभिजात फिल्म सोसायटीचे अध्यक्ष जितेंद्र पाटील, कोषाध्यक्ष धनंजय कुलकर्णी, अभिनेते सचिन दानाई, डॉ. स्वप्नील देशमुख, आदित्य कुलकर्णी, अभिषेक बुचके, प्रथमेश जाधव, श्रीनिवास कुलकर्णी, प्रा.डॉ. विश्वास शेंबेकर, डॉ दुर्गा शर्मा, शिवशंकर पटवारी यांच्यासह कला व सांस्कृतिक क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते.



# संशोधन कार्यपद्धतीवर दोन दिवसीय कार्यशाळा संपन्न

लातूर : दयानंद शिक्षण संस्था संचलित दयानंद वाणिज्य महाविद्यालय, लातूर आणि शिवाजी महाविद्यालय, रेणापूर यांच्या संयुक्त विद्यमाने संशोधन कार्यपद्धती (गृहितक चाचणी) या विषयावर दोन दिवसीय कार्यशाळा दयानंद वाणिज्य महाविद्यालयात यशस्वीरित्या संपन्न झाली. ही कार्यशाळा ९ व १० फेब्रुवारी २०२६ रोजी संशोधन विद्यार्थी व प्राध्यापकांसाठी आयोजित करण्यात आली होती.

या कार्यशाळेत विविध महाविद्यालयांतील एकूण ४२ संशोधक विद्यार्थी व प्राध्यापकांनी सहभाग नोंदविला. कार्यशाळेचे उद्घाटन व समारोप प्राचार्य डॉ.प्रशांत मान्नीकर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडले. प्रमुख मार्गदर्शक म्हणून स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड (उपकेंद्र लातूर) येथील संचालक डॉ.सागर कोंडेकर यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. या कार्यशाळेत संशोधन करताना घ्यावयाची काळजी, संशोधनातील विविध चाचण्या तसेच प्रभावी गृहितक कशी तयार करावीत यावर सविस्तर माहिती देत प्रात्यक्षिकाद्वारे समजावून सांगण्यात आले. प्राचार्य डॉ. प्रशांत मान्नीकर, प्रभारी प्राचार्य डॉ. सतीश यादव, उपप्राचार्य डॉ. रमाकांत घाडगे आणि उपप्राचार्य डॉ. गणेश लहाने यांच्या मार्गदर्शनाखाली ही कार्यशाळा यशस्वीरित्या पार पडली. समारोप कार्यक्रमाच्या मंचावर डॉ. गणेश लहाने, शिवाजी महाविद्यालयाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. पांडूरंग पवार, दयानंद वाणिज्य महाविद्यालयाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. बाळासाहेब चव्हाण, वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. मनिषा आष्टेकर, रिसर्च सेंटरचे प्रभारी प्रा. अक्षय पवार उपस्थित होते. कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी प्रा. सुहाना शेख, प्रा.साक्षी पाटील व प्रा. ऐश्वर्या कुलकर्णी यांनी परिश्रम घेतले. उद्घाटन व समारोप प्रसंगी सूत्रसंचालन प्रा. माहेश्वरी पटणे यांनी तर आभार प्रदर्शन प्रा. अजय चव्हाण यांनी केले.

पान १ वरून

## मुंबईवर भाजपाचा...

प्रशासनासाठी मते मागितली होती. जनतेने दिलेल्या प्रतिसादानुसारच आज महायुतीचे दोन्ही शिलेदार पदावर विराजमान झाले आहेत. रितू तावडे यांनी यापूर्वीही मुंबईकरांच्या समस्यांवर नेहमीच आक्रमक भूमिका घेतली आहे, त्यामुळे त्यांच्या अनुभवाचा फायदा शहराच्या विकासासाठी निश्चितपणे होईल. राज्य सरकारने मुंबईच्या विकासाचा जो भव्य कार्यक्रम हाती घेतला आहे, तो आता महानगरपालिकेच्या माध्यमातून अधिक प्रभावीपणे राबवला जाईल, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला. रितू तावडे आणि उपमहापौर संजय घाडी यांच्या नेतृत्वाखाली मुंबई महापालिका पुन्हा एकदा सामान्य जनतेसाठी काम करणारी संस्था ठरेल, अशी ग्वाही देखील त्यांनी यावेळी दिली.

उपमहापौर संजय घाडी यांच्यावर कौतुकाचा वर्षाव केला. संजय घाडी हे शिवसेनेचे अत्यंत जुने, जाणते आणि अनुभवी शिवसैनिक आहेत. त्यांच्या दीर्घ अनुभवाचा फायदा मुंबईच्या कारभाराला गती देण्यासाठी निश्चितपणे होईल, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केला. हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचे जन्मशताब्दी वर्ष जवळ येत आहे. याचे औचित्य साधून मुख्यमंत्री म्हणाले की, बाळासाहेबांना ज्या प्रकारचं लोकाभिमुख आणि मुंबईकरांच्या हिताचं प्रशासन अपेक्षित होतं, अगदी तसंच प्रशासन या महापालिकेच्या माध्यमातून देण्याचा आमचा प्रयत्न असेल. नवीन महापौर आणि उपमहापौर ही जोडी बाळासाहेबांच्या विचाराने पालिकेचा गाडा हाकतील, असेही त्यांनी नमूद केले. मी आणि एकनाथ शिंदे पूर्ण ताकदीने या टीमच्या पाठीशी उभे आहोत. आम्ही जी 'नवी मुंबई' घडवण्याचे स्वप्न पाहत आहोत, त्या विकासाला गती देण्याचे काम महापालिका पदाधिकारी करतील, असे आश्वासन त्यांनी दिले. सामान्य मुंबईकरांच्या प्रलंबित समस्या आणि त्यांची स्वप्ने पूर्ण करण्यासाठी राज्य सरकार आणि महानगरपालिका आता हातात हात घालून काम करणार असल्याचे स्पष्ट संकेत मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत.

## अजित पवारांच्या...

अपघातस्थळावरील नमुने न्यायवैद्यक तपासणीसाठी पाठवण्यात आले आहेत, अशी माहितीही मुख्यमंत्र्यांनी दिली.

देशातील तपास यंत्रणांवर शंका नको - फडणवीस

- भारताच्या तपास यंत्रणा आंतरराष्ट्रीय स्तरावर कार्यरत असून अनेक देशांकडून भारतीय अधिकाऱ्यांना चौकशीसाठी निमंत्रित केले जाते. त्यामुळे त्यांच्यावर अविश्वास दाखवण्याचे कारण नाही. भावनेच्या भरात काही विधाने झाली असतील; मात्र देशाच्या यंत्रणांवर शंका घेऊ नये, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

- अजित पवार यांच्या दुर्दैवी मृत्यूचे राजकारण करू नये, असे आवाहन करत मुख्यमंत्री म्हणाले की, त्यांच्या अपघाती निधनाचे सत्य बाहेर यावे, अशी सर्वांचीच इच्छा आहे आणि ते निश्चितपणे समोर येईल, असा मला विश्वास आहे. कोणाकडे काही मुद्दे किंवा शंका असतील, तर त्यांनी ते डीजी सेफ्टीकडे पाठवावेत. शंका व्यक्त करणे चुकीचे नाही; मात्र त्याचा राजकीय हेतूने वापर होऊ नये, याची प्रत्येकाने काळजी घ्यावी, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले.

## राज ठाकरे...

असे सांगताना कोश्यारी यांनी प्रभू राम आणि त्यांच्या प्रजेचा दाखला दिला. ज्या पद्धतीने रामाला सर्व प्रजा समान होती, त्याचप्रमाणे मोदींसाठीही सर्व नागरिक समान आहेत, असे ते म्हणाले. राज ठाकरे माझे 'लहान भाऊ' आहेत. ते वाणीने कडक असले तरी चांगले नेते असल्याचेही त्यांनी नमूद केले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या कर्मभूमीत राहणाऱ्यांनी घाबरण्याचे कारण नसल्याचे सांगत, चुकीचे काम करण्यास घाबरावे; मात्र व्यक्तींना घाबरू नये, असा सल्लाही भगतसिंह कोश्यारी यांनी दिला.

## जि. प. व पं.

साखर कारखान्याचे उपाध्यक्ष अशोक काळे, जिल्हा बँकेचे उपाध्यक्ष अँड प्रमोद जाधव, रेणा साखर कारखान्याचे उपाध्यक्ष अँड. प्रवीण पाटील, संत शिरोमणी मारुती महाराज साखर कारखान्याचे अध्यक्ष शाम भोसले, नूतन जिल्हा परिषद सदस्या सौ. आशाताई भिसे, सौ. अश्विनी शिंदे, सौ. भागीरथी पाटील, सौ. मनीषा कदम, सौ. दीपाली भोसले, सौ. दिपाली आदमाने, सौ. रुपाली वाघमारे, सौ. नागेश्वरी केंद्रे, शांताबाई अदावले, जिल्हा परिषद सदस्य महादेव मस्के, बाळू (श्रीकांत) माने, दत्तात्रय टेकाळे, पंचायत समिती सदस्य सत्यनारायण पाटील, बाळासाहेब कदम, अक्षय देशमुख, महेश चव्हाण, विलास उपाडे, सौ. शरयू गायकवाड, सौ. शिवानी शिंदे, पूजा जाधव, सौ. दिपाली कराड, उद्धव जाधव, बालाजी गोटके, सौ. मिरा सूर्यवंशी, राजेश केंद्रे, श्रीकांत बैले यांच्यासह जळकोट तालुका काँग्रेस अध्यक्ष मारुती पांडे, बाजार समितीचे सभापती जगदीश बावणे, रेणा साखर कारखान्याचे माजी अध्यक्ष तथा संचालक सर्जेराव मोरे, जिल्हा बँकेचे संचालक राजकुमार पाटील, सचिन पाटील, रवींद्र काळे, सचिन दाताळ, हरिराम कुलकर्णी, शिवाजी कांबळे, दयानंद बिडवे, श्रीकृष्ण काळे , सुरेश चव्हाण, बाबुराव जाधव, दत्ता शिंदे, सचिन शिंदे, बचाटे, अमोल भिसे, संभाजी रेड्डी, गणपतराव बाजुळगे, मकबूल वलांडीकर, चाँदपशा इनामदार, प्रा. शशिकांत कदम यांच्यासह विविध संस्थांचे पदाधिकारी कार्यकर्ते पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सिंहस्थाच्या पार्श्वभूमीवर...

बैठकी दरम्यान मंत्री भुजबळ यांनी सांगितले की, सन २०२५-२६ या वर्षासाठी नाशिक जिल्हा वार्षिक योजना अंतर्गत ९०० कोटी इतकी तरतूद करण्यात आली होती. मात्र सन २०२६-२७ साठी प्रस्तावित तरतूद ६९१.९० कोटी इतकी मर्यादा कळवण्यात आली आहे.जिल्ह्याचा वेगाने होत असलेला विकास, नाशिक जिल्ह्यातून मिळणारा सर्वाधिक महसूल,वाढती लोकसंख्या आणि विविध विभागांकडून प्राप्त झालेल्या वाढीव मागण्या लक्षात घेता निधी कमी करू नये असे त्यांनी बैठकीत स्पष्ट केले.

नाशिक जिल्ह्यातील पर्यटन वाढीसाठी नाशिक कलाग्राम आणि गंगापूर धरण येथील सी प्लेन बाबत लवकर कार्यवाही करण्याची त्यांनी मागणी केली. तसेच सन २०२५-२६ या आर्थिक वर्षातील मंजूर निधीचा आढावा घेताना त्यांनी प्रशासनाला निधी खर्चाच्या प्रक्रियेला गती देण्याच्या सूचना दिल्या. सर्व योजनांच्या सर्व प्रशासकीय मान्यता तातडीने देण्यात याव्या तसेच मार्च अखेर पर्यंत १००टक्के निधी खर्च होईल याची दक्षता जिल्हा प्रशासनाने घ्यावी, असे त्यांनी स्पष्ट निर्दे श दिले.

नाशिक जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यासाठी शासन सकारात्मक भूमिका घेईल, अशी अपेक्षा मंत्री छगन भुजबळ यांनी व्यक्त केली. शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी शाळा खोल्यांची दुरुस्ती आणि वर्गखोल्यांसाठी वाढीव निधीची मागणी केली.

## शरद पवारांना....

डिस्चार्ज देण्याचे नियोजन वैद्यकीय पथकाकडून करण्यात येत आहे, अंतिम निर्णय त्यांच्या प्रकृतीतील सातत्यपूर्ण सुधारणा लक्षात घेऊन घेतला जाईल असे त्यांनी सांगितले आहे.

दरम्यान राष्ट्रवादीचे (शरद पवार) अध्यक्ष ज्येष्ठ नेते शरद पवार यांना श्वास घेण्यास त्रास होत असल्याच्या कारणास्तव सोमवारी (दि. ९) दुपारी साडेतीनच्या सुमारास पुण्यातील रुबी हॉल क्लिनिकमध्ये दाखल करण्यात आले. यावेळी रुबीचे संचालक डॉ. सायमन ग्रॅण्ट यांच्या मार्गदर्शनाखाली पवार यांची प्राथमिक तपासणी करण्यात आली.

## सन २०२६-२७ साठी...

आंबेडकर यांच्या स्मारकाच्या कामासाठी अतिरिक्त निधीचा प्रस्ताव, तसेच माजी केंद्रीय गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर यांच्या स्मारकाचा प्रस्ताव महानगरपालिकेने तातडीने शासनाला सादर करावा. यासाठी राज्य शासनामार्फत निधी उपलब्ध करून देण्यात येईल, असे त्यांनी सांगितले. बाह्यवळण रस्त्याच्या ८ किलोमीटर लांबीच्या रस्त्यासाठी आवश्यक भूसंपादनाची कार्यवाही गतीने करण्यात येईल, असेही ते म्हणाले.

अहमदपूर, चाकूर तालुक्यातील रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी मोठ्या प्रमाणात निधीची आवश्यकता आहे. तीर्थवाडी ते चाकूर रस्त्याचा प्रश्न अनेक दिवसांपासून प्रलंबित आहे. हा प्रश्न सोडविण्याला प्राधान्य देण्यात यावे, या रस्त्याच्या कामाला निधी उपलब्ध करून दिल्यास नागरिकांची गैरसोय दूर होईल. तालुक्यातील विविध ठिकाणी वीज उपकेंद्रांची कामे मंजूर आहेत. मात्र, अनेक कामे अद्यापही सुरु झालेली नाहीत. त्यामुळे शेतकऱ्यांना अखंडित वीज पुरवठा होत नसल्याची बाब सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी यावेळी मांडली. अतिवृष्टी काळात अहमदपूर, चाकूर तालुक्यातील सिंचन तलावांचे सांडवे फुटले आहेत. या सांडव्याच्या दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध करून द्यावा. तसेच ग्रामीण रुग्णालय, प्राथमिक आरोग्य केंद्रातील आवश्यक सुविधांसाठीही निधी उपलब्ध करून द्यावा, असे ते म्हणाले.

ग्रामीण रस्त्यांची दुरुस्ती तातडीने करणे आवश्यक आहे. काही रस्त्यांची कामे अनेक वर्षांपासून प्रलंबित आहेत. तसेच अर्ज केलेल्या शेतकऱ्यांना लवकरात लवकर सौरकृषी पंप द्यावेत, असे खासदार डॉ. शिवाजी काळगे यांनी सांगितले. तसेच लातूर शहरात भुयारी गटार योजनेसाठी खोदलेल्या रस्त्यांची योग्य प्रकारे दुरुस्ती करण्याची सूचना त्यांनी केली.

अतिवृष्टीमुळे रस्ते, विद्युत रोहीत्रांचे नुकसान झाले असून दुरुस्तीसाठी वाढीव निधीची आवश्यकता आहे. याबाबतची मागणी राज्यस्तरीय बैठकीत करावी. तसेच सध्या इयत्ता बारावी, इयत्ता दहावी परीक्षा काळात वीज पुरवठा खंडित होवू नये, याची दक्षता घ्यावी, असे आमदार विक्रम काळे यावेळी म्हणाले.

लातूर शहराच्या बाह्य वळण रस्त्याचा प्रलंबित प्रश्न लवकरात लवकर मार्गी लावावा. त्यासाठी आवश्यक कार्यवाही गतीने पूर्ण करावी. लातूर शहरातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकाच्या कामाला गती द्यावी. माजी केंद्रीय गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर यांचे स्मारक उभारण्यासाठी आवश्यक कार्यवाही लवकर व्हावी, असे आमदार अमित विलासराव देशमुख यावेळी म्हणाले.

मुख्यमंत्री महोदय देवेंद्र फडणवीस यांनी माजी केंद्रीय गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर यांचे स्मारक उभारण्याची ग्वाही दिली आहे. त्यानुसार महानगरपालिकेने जागा निश्चित करून याबाबतचा प्रस्ताव शासनाला पाठवावा. ग्रामीण भागात जल जीवन मिशनची कामे अपूर्ण ठेवणाऱ्या कंत्राटदारांवर जिल्हा परिषदेने कठोर कार्यवाही करावी, असे आमदार संभाजी पाटील निलंगेकर म्हणाले. तसेच जिल्हा परिषद शाळांमध्ये मुलींसाठी स्वच्छतागृह उभारणी, शाळांमध्ये सौर ऊर्जा वापरावर भर द्यावा, असे त्यांनी सांगितले.

उदगीर, जळकोट तालुक्यातील निजामकालीन शाळांच्या इमारतींची तातडीने दुरुस्ती होणे गरजेचे आहे. यासोबतच उदगीर येथे उभारण्यात आलेल्या विश्वशांती बुद्ध विहार परिसरात विद्युत रोषणाई करण्याच्या कामासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून द्यावा, असे आमदार संजय बनसोडे यांनी सांगितले. तसेच उदगीर तालुक्यात अल्पसंख्याक विभागामार्फत मुलींच्या वसतिगृहाच्या इमारतीचे बांधकाम करण्यात आले आहे. या इमारतीच्या अंतर्गत फर्निचर कामासाठी निधी उपलब्ध करून दिल्यास हे वसतिगृह सुरु करणे शक्य होईल, असे त्यांनी सांगितले.

औसा मतदारसंघामध्ये ११ विद्युत उपकेंद्रांची कामे मुदत संपूनही पूर्ण झालेली नाहीत. त्यामुळे संबंधित कंत्राटदाराकडून ही कामे काढून घेऊन निकषात बसणाऱ्या दुसऱ्या एजेन्सीकडून पूर्ण करून घ्यावीत अशी मागणी आमदार अभिमन्यू पवार यांनी केली. लातूर शहरातील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून द्यावा. तसेच गंजगोलाई परिसरात अतिक्रमणमुक्तीसाठी महानगरपालिकेने तत्काळ आवश्यक कार्यवाही करावी, असे त्यांनी सांगितले.

लातूर जिल्ह्यात ज्या गावांमध्ये स्मशानभूमीसाठी जमीन उपलब्ध नाही, तिथे जमिनीसाठी निधी उपलब्ध करून द्यावा. तसेच जमीन उपलब्ध असलेल्या गावांमध्ये स्मशानभूमी शेड उभारणीसाठी निधी देवून पूर्ण जिल्ह्यातील स्मशानभूमीचा विषय मार्गी लावावा, असे आमदार रमेश कराड म्हणाले. जिल्हा परिषद शाळेतील स्वच्छता गृहांना नियमित पाणी पुरवठा करण्यासाठीही ठोस उपाययोजना हाती घ्यावात. अतिवृष्टीमुळे वाहून गेलेल्या रस्ते, पुलांच्या दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध करून द्यावा, असे त्यांनी सांगितले.

प्रारंभी जिल्हा नियोजन अधिकारी सोमनाथ रेड्डी यांनी सन २०२५-२६ मध्ये ३१ जानेवारी २०२६ अखेर जिल्हा वार्षिक योजनेतून झालेल्या खर्चाची व सन २०२६-२७ मध्ये प्रस्तावित कामांची माहिती दिली.

माजी केंद्रीय गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर, उपमुख्यमंत्री अजित पवार यांना श्रद्धांजली

माजी केंद्रीय गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. तसेच दोन मिनिटे मौन पाळून श्रद्धांजली वाहण्यात आली. विमानतळ, रेल्वे स्थानक विकासासाठी स्वतंत्र लेखाशीर्ष सुरु करण्याची मागणी करणार जिल्हा नियोजन समितीमध्ये लेखाशीर्ष नसल्याने जिल्ह्यातील विमानतळ, रेल्वे स्थानकांमधील विकास कामांसाठी जिल्हास्तरावर निधीची तरतूद करता येत नाही. त्यामुळे जिल्हा नियोजन समितीमध्ये या बाबींसाठी स्वतंत्र लेखाशीर्ष सुरु करण्याची विनंती करणार असल्याचे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यावेळी म्हणाले. त्यामुळे रेल्वे स्थानकावर प्रवाशांसाठी काही प्रमाणात सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी निधी उपलब्ध करून देता येईल. तसेच विमानतळ विकासाला मदत होईल, असे त्यांनी सांगितले.

ऊर्जा संवर्धन पुरस्कार, ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमांतर्गत कामगिरीबद्दल जिल्हाधिकाऱ्यांचे अभिनंदन

राज्य शासनाच्या १५० दिवसांच्या ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमांतर्गत राज्यातील सर्वोत्कृष्ट पाच जिल्हाधिकारी कार्यालयांमध्ये लातूर जिल्हाधिकारी कार्यालयाचा समावेश करण्यात आला. तसेच ऊर्जा संवर्धनाच्या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल लातूरच्या जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांना ऊर्जा मंत्रालयाचा ङ्कऊर्जा संवर्धन पुरस्कार २०२४-२५फ जाहीर झाला आहे. यानिमित्त जिल्हा नियोजन समिती बैठकीत जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांचे अभिनंदन करण्यात आले.

पुढील वर्षासाठी ५११.५४ कोटी १४ लाख रुपयांचा आराखडा; वाढीव निधीसाठी प्रयत्न

लातूर जिल्ह्यासाठी सन २०२६-२७ करिता जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत ३८३ कोटी ८१ लाख रुपये, जिल्हा वार्षिक योजना (अनुसूचित जाती घटक कार्यक्रम) अंतर्गत १२५ कोटी रुपये आणि जिल्हा वार्षिक योजना (आदिवासी क्षेत्राबाहेरील उपयोजना) अंतर्गत ३ कोटी २३ लाख रुपये अशा एकूण ५११ कोटी ५४ लाख रुपयांच्या प्रारूप आराखड्याला जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. यामध्ये जिल्हा विकास आराखड्यासाठी २५ टक्के निधी प्रस्तावित केला असून याअंतर्गत जिल्ह्यात कृषी व संलग्न सेवा, उद्योग आणि सेवा क्षेत्रातील विविध कामांवर भर देण्यात येणार आहे. लातूर जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे नुकसान झालेले रस्ते, अंगणवाडी, शाळा दुरुस्तीसह जिल्ह्यास आवश्यक ग्रामविकास, वने, पशुसंवर्धन, ऊर्जा विकास, वैद्यकिय शिक्षण व सार्वजनिक आरोग्य, लघु पाटबंधारे, सामान्य शिक्षण, नगर विकास पर्यटन, यात्रास्थळ आदी क्षेत्रांच्या विकासासाठी शासन स्तरावर २१६ कोटी ६९ लाख रुपयांची वाढीव मागणी राज्यस्तरीय बैठकीत करण्यात येणार असल्याचे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी सांगितले.

# मागील भांडणाच्या कारणावरून महिलेस लोखंडी रॉड व काठीने मारहाण

धाराशिव (प्रतिनिधी) मागील भांडणाच्या कारणावरुन एका महिलेस शिवीगाळ करुन लाथाबुक्यांनी, लोखंडी रॉड व काठीने मारहाण करुन जखमी केले. तसेच जिवे ठार मारण्याची धमकी दिल्याची घटना दि.२५ जानेवारी रोजी घडली आहे.

बीड जिल्ह्यातील धारुर तालुक्यातील बागलवाडी येथील संतोष अर्जुन मुंढे व लक्ष्मण अर्जुन मुंढे धाराशिव जिल्ह्यातील वाशी तालुक्यातील सोनारवाडी येथील धनंजय रावसाहेब घोळवे यांनी दि. २५ जानेवारी २०२६ रोजी १० वाजण्याच्या सुमारास बीड जिल्ह्यातील माजलगाव तालुक्यातील सुलतानपूर येथील उषाबाई शहाजी जायभाय, वय ३५ वर्षे, रा. सुलतानपुर ह मु भूम तालुक्यातील बाणगंगा साखर कारखाना, ईडा यांना नमुद आरोपींनी मागील भांडणाचे कारणावरुन शिवीगाळ करुन लाथाबुक्यांनी, लोखंडी रॉड व काठीने मारहाण करुन जखमी केले. जिवे ठार मारण्याची धमकी दिली. या प्रकरणी उषाबाई जायभाय यांनी दि.९ फेब्रुवारी रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन परंडा पोलीस ठाण्यात भा.न्या. सं. कलम ११८ (१), ११५ (२), ३५२, ३५१ (२), ३ (५) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

Printed by, Owned by, Published by & Edited by GANGADHAR ABHANG DIGOLE , Printed by GHONE NARASHINHA PANDURANG, Printed at Magic Publication, Shop No.10, MANAPA SHOPING COMPLEX, GANDHI CHOWK, LATUR, Tq.& Dist. LATUR - 413512 & Published at H.No.255, Shri SAI SCHOOL NEAR, Sona Nagar, Barshi Road, LATUR, DIST- LATUR-413512 Tq.& Dist. PARBHANI - 431401 MAH. Editor : GANGADHAR ABHANG DIGOLE RNINO.MHMAR/25/A1409

हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक- गंगाधर अभंग डिगोळे यांचे करीता घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १० मनपा शॉपिग कॉम्प्लेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय घर नं. २५५, श्री साई स्कूल निअर सोना नगर, बार्शी रोड, लातूर, ता. जि. लातूर . - ४१३५१२, येथे प्रकाशित केले. संपादकः गंगाधर अभंग डिगोळे मो.९४०५२९५२०, ९०२८८४५२३३ RNINO.MHMAR/25/A1409

# राजकीय क्षेत्रात धर्म आला की लोकशाहीचे अवमूल्यन होते - डॉ. गव्हाणे



धाराशिव (प्रतिनिधी) डॉ मोईन शाकीर यांनी आयुष्यभर लोकशाहीचे मूल्य जपण्याचे कार्य केले. त्यांनी धर्म निरपेक्षतेची शिकवण आपल्या विचारांतून समाजास दिली. त्यांच्या मते धर्म व विज्ञान यांचा समन्वय साधण्याची आज खूप आवश्यकता आहे. कारण या समन्वयामुळेच लोकशाही अबाधित राहील, माणूस एकच असून सर्वांच्या शरीराची ठेवण ही एकच आहे. ती नैसर्गिक देणगी असून आपल्या धार्मिक प्रार्थना जरी वेगवेगळ्या असल्या तरी कुठेतरी त्यातही साम्य आहे. धर्माचे पालन हे वैयक्तिक असावे. मात्र ते राजकीय क्षेत्रात नसावे. कारण असे जर झाले तर लोकशाहीचे मूल्य हे पायदळी तुडवले जाईल. त्यामुळे राजकीय क्षेत्रात धर्म आला की लोकशाहीचे अवमूल्यन होत असल्याचे प्रतिपादन लातूर येथील राजर्षी शाहू महाविद्यालयाचे डॉ. महादेव गव्हाणे यांनी केले.

धाराशिव शहरातील रामकृष्ण परमहंस महाविद्यालयात डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर आणि रामकृष्ण महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने जेष्ठ राजकीय अभ्यासक डॉ मोईन शाकीर व्याख्यानमालेचे आयोजन तीन सत्रामध्ये करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते. व्याख्यानमालेचे उद्घाटन प्राचार्य डॉ संदीप देशमुख यांच्या उपस्थितीत करण्यात आले. यावेळी मुरुम येथील श्री माधवराव पाटील महाविद्यालयाचे डॉ महेशकुमार मोटे व डॉ आनंद करडे आदींची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलताना प्राचार्य गव्हाणे म्हणाले की, धर्माच्या, भाषेच्याही पलीकडे माणूस आहे. त्यामुळे आज माणसाला माणसांचीच जास्त भीती आहे.

मतदानाचा अधिकार म्हणजे लोकशाही नाही. तर देशातले आंदोलने संपले की लोकशाही संपली असे असे त्यांनी सांगितले. तर द्वितीय सत्रात डॉ मोटे म्हणाले की, आपल्याला माणूस म्हणून जन्म मिळाला ही बाब महत्त्वाची नसून तो कसा जगला ? हे महत्त्वाचे आहे. तसेच डॉ शाकीर हे लोकशाहीचे खंदे समर्थक होते. त्यांच्या मते जनताच लोकशाही चालवत असते. लोकशाहीला जीवनशैली माणून लोकशाहीचा अंगिकार करणे गरजेचे आहे. व्यक्तिला सामाजिक प्रतिष्ठा प्राप्त झाली की, तो लोकशाहीशी सुसंगत होतो. त्यामुळे जन आंदोलने ही लोकशाही जीवंत असल्याचे द्योतक असल्याचे त्यांनी सांगितले. तर तृतीय सत्रामध्ये डॉ करडे हे म्हणाले की, हमीद दलवाई, डॉ असगर अली, डॉ मौलाना आझाद यांचे कार्य भारतीयांना विसरता येणार नाही. डॉ मोईन शाकीर हे एक शिक्षक या नात्याने विद्यार्थ्यांशी जोडले गेले होते. हा आदर्श आपण घेणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच सत्राची सांगता प्राचार्य डॉ प्रकाश कांबळे यांनी केली. व्याख्यानमालेच्या यशस्वितेसाठी राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ दत्तात्रय साखरे, डॉ बालाजी गुंड, डॉ मंगेश भोसले यांच्यासह सर्व शिक्षकांनी परिश्रम घेतले. व्याख्यानमालेचे सूत्रसंचालन डॉ अरविंद हंगरगेकर यांनी तर आभार डॉ गुंड यांनी मानले.

# बालविवाह मुक्त भारत अभियानासाठी 'मुक्तीरथ'द्वारे जनजागृती जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या हस्ते हिरवी झेंडी




नांदेड(प्रतिनिधी ):-जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय व जनसेवा ग्रामीण विकास व शिक्षण प्रतिष्ठान, नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणाऱ्या बालविवाह मुक्त भारत अभियान अंतर्गत 'मुक्तीरथ'ला आज मंगळवारी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून मार्गस्थ करण्यात आले.

बालविवाह मुक्त भारत अभियान हे भारत सरकार व विविध राज्य सरकारांच्या संयुक्त प्रयत्नांतून राबविण्यात येणारे राष्ट्रीय पातळीवरील जनजागृती व कृती अभियान आहे. १८ वर्षांखालील मुलींचे व २१ वर्षांखालील मुलांचे विवाह पूर्णतः थांबवणे, हा या अभियानाचा मुख्य उद्देश आहे.

या अभियानाच्या माध्यमातून बालविवाहाची सामाजिक रूढी नष्ट करणे, मुलींचे शिक्षण टिकवून ठेवणे, बालकांचे आरोग्य व सुरक्षित भविष्य सुनिश्चित करणे, कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करणे तसेच समाजात जनजागृती वाढवणे, ही प्रमुख उद्दिष्टे साध्य करण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे.

यावेळी जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी गणेश वाघ, महिला व बालकल्याण जिल्हा परिषदेचे प्रशांत थोरात जिल्हा परिविक्षा अधिकारी श्री. व्ही. एस. नरसीकर, परिविक्षा अधिकारी गजानन जिंदमवार, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी श्रीमती विद्या आळणे, जनसेवा प्रतिष्ठानचे निलेश कुलकर्णी, श्रीमती आशा सूर्यवंशी, अरुण कांबळे यांच्यासह संबंधित अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. यावेळी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले व वरिष्ठ अधिकाऱ्यांनी बालविवाह मुक्त भारत अभियानांतर्गत स्वाक्षरी मोहिमेत सहभाग नोंदवून बालविवाह निर्मूलनाचा संदेश दिला. मुक्तीरथाच्या माध्यमातून जिल्ह्यात विविध ठिकाणी जनजागृती करण्यात येणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

# साडी वॉक्थॉनला महिलांचा अभूतपूर्व प्रतिसाद




धाराशिव (प्रतिनिधी) कॅन्सर जनजागृतीसाठी आयोजित करण्यात आलेल्या साडी वॉक्थॉन या उपक्रमाला महिलांनी उत्स्फूर्त व अभूतपूर्व प्रतिसाद दिला. भल्या पहाटेपासूनच तुळजाभवानी स्टेडियम परिसर महिलांच्या गर्दीने दि.८ फेब्रुवारी रोजी फुलून गेला होता.

ओस्ला ओयासीस लेडीज फाउंडेशन, धारासुरमर्दिनी महिला फेडरेशन, आय.एम.ए. डॉक्टर वुमन्स विंग, अक्षरवेल महिला साहित्य मंडळ, रोटरी क्लब ऑफ धाराशिव, निमा वुमन्स फोरम यांच्यावतीने द रियल इस्टेट मॉल प्रस्तुत साडी वॉक्थॉन यशस्वीरित्या पार पडली. कार्यक्रमाची सुरुवात तुळशीला पाणी घालून, दीपप्रज्वलन व हिरवा झेंडा दाखवून करण्यात आली. यावेळी रोटरी डिस्ट्रिक्ट गव्हर्नर सुधीर लातुरे व सौ. संगीता लातुरे, शहराच्या प्रथम नागरिक नगराध्यक्षा सौ. नेहा काकडे, कार्यक्रमाच्या प्रमुख संयोजक व ओस्लाच्या संस्थापक सौ. किरण देशमाने यांच्यासह मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. यामध्ये कमलताई नलावडे, डॉ. कौशाली राजगुरू, डॉ. रेखा ढगे, नीता कठारे, डॉ. दीपिका सस्ते, डॉ. अस्मिता बुरगुटे, डॉ. श्रद्धा मुळे, डॉ. दिपाली रामढवे, शशांकी संगवे, राहुल काकडे, संजय देशमाने, रणजीत दुरुगकर, प्रदीप खामकर आदी मान्यवर उपस्थित होते. सुंदर साड्या परिधान करून सहभागी झालेल्या महिलांसाठी कॅन्सर जनजागृतीसाठी पुण्याच्या प्रसिद्ध कॅन्सर तज्ञ डॉ. श्रुती गांधी यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. यावेळी धाराशिवचे नाव लौकीक करणाऱ्या पुरातत्व संशोधक माया जगदीश पाटील, उद्योजिका पूर्वी गजेंद्रगडकर, उद्योजिका प्रतिभा देशमुख, राज्यस्तरीय बॉडी बिल्डर स्नेहा बर्डे आणि लवकरच प्रदर्शित होणाऱ्या जब्राट चित्रपटाच्या निर्मात्या, दिग्दर्शिका व लेखिका प्रगती कोळगे यांना धाराशिव नारी शक्ती पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमात महिलांसाठी विशेष झुंबा सेशन आयोजित करण्यात

आले होते. तसेच कुपनच्या माध्यमातून लकी ड्रॉ काढण्यात आला. त्यामुळे अनेक महिलांना साड्या, सोन्या-चांदीचे दागिने व रोख बक्षिसे मिळाली. तुळजाभवानी स्टेडियममधून निघालेली ही महिला रॅली डॉ बाबासाहेब आंबेडकर चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, पोलीस मुख्यालय मार्गे बसवेश्वर चौक ते फुलाई मल्टीस्टेट समोरून यू-टर्न घेत पुन्हा तुळजाभवानी स्टेडियम येथे परतली. संपूर्ण मार्गावर महिलांचा उत्साह, शिस्त व सकारात्मक संदेश दिसून आला.

साडी वॉक्थॉनच्या यशस्वितेसाठी सर्व महिला संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. जास्तीत जास्त महिलांना कुपन देऊन सहभागी करून घेतल्याबद्दल अक्षरवेल महिला साहित्य मंडळ यांना प्रथम क्रमांक देऊन सन्मानचिन्ह व रोख रक्कम देण्यात आली, तर जैन महिला मंडळ यांना द्वितीय क्रमांक मिळाला. विशेष म्हणजे गेल्या १५ ते २० वर्षांपासून कॅन्सरशी झुंज देणाऱ्या महिलांच्या धैर्य, जिद्द व सकारात्मकतेचा विशेष सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. श्रद्धा मुळे आणि प्रगती शेरखाने यांनी केले.

# वृद्ध दांपत्यास काठी, प्लॅस्टीक पाईप व उसाने जबर मारहाण

धाराशिव (प्रतिनिधी) शेतात असलेल्या बंद घराचा दरवाजा वाजवला असता ८० वर्षीय वृद्ध शेतकऱ्याने उघडून बाहेर आल्यावर त्यास दांपत्यास काठीने मारहाण केली. त्याच्या रडण्याचा आवाज ऐकून पत्नी बाहेर येताच त्यांनी देखील त्या दोन अज्ञात व्यक्तींनी प्लॅस्टीक पाईप व उसाने जबर मारहाण केल्याची घटना दि.१ फेब्रुवारी रोजी घडली. याबाबत पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार परंडा तालुक्यातील दुधी येथील लिमकर वस्तीतील वसंत ज्ञानदेव लिमकर (वय ८० वर्षे) यांना दि.१ फेब्रुवारी रोजी २ ते ३ वाजण्याच्या सुमारास शेत गट नं ३६ मध्ये दुधी येथे अज्ञात दोन इसमांनी दरवाजा वाजवल्यामुळे लिमकर यांनी दरवाजा उघडून बाहेर गेले असता अज्ञात दोन इसमांनी त्यांना काठीने मारहाण करुन जखमी केले. तसेच त्यांची पत्नी मंगल या नवऱ्याचा आवाज ऐकूण बाहेर आल्या असता त्यांनाही नमुद इसमांनी प्लॅस्टीक पाईप व उसाने मारुन गंभीर जखमी केले. या प्रकरणी वसंत लिमकर यांनी परंडा पोलीस ठाण्यात दि.९ फेब्रुवारी रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन परंडा पोलीस ठाण्यात भा.न्या.सं. कलम ११८ (२), ३ (५) भारतीय हत्यार कायदा अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

# महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाचे हिरक महोत्सवी अधिवेशन उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या हस्ते होणार उद्घाटन

## उपस्थित राहण्याचे जिल्हा ग्रंथालय संघाचे आवाहन

लातूर, महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाचे हिरक महोत्सवी,कोकण विभाग ग्रंथालय संघाचे २७ वे आणि रत्नागिरी जिल्हा ग्रंथालय संघाचे ४९ वे अधिवेशन दि.२१ व २२ फेब्रुवारी २०२६ रोजी रत्नागिरी जिल्हा ग्रंथालय संघ आणि स्व.आम.कुसुमताई अभ्यंकर ग्रंथालय संघ यांच्या संयुक्त विद्यमाने स्वामी समर्थ मंगल कार्यालय,साळवी स्टॉप.ता.जि.रत्नागिरी येथे आयोजित केले असून,या तिहेरी अधिवेशनाचे उद्घाटन राज्याचे उद्योग मंत्री पालकमंत्री उदय सामंत यांच्या हस्ते दि.२१ फेब्रुवारीला सकाळी १० वाजता होणार आहे.

सदर संयुक्त अधिवेशनाच्या निमित्ताने दि.२१ फेब्रुवारी २६ रोजी सकाळी ८.३० वाजता नवलाई देवी मंदीर ते अधिवेशन स्थळ दरम्यान ग्रंथदिंडी निघणार आहे. त्यानंतर १० वाजता राज्य ग्रंथालय संघाचे अध्यक्ष डॉ.गजानन कोटेवार यांच्या अध्यक्षतेखाली अधिवेशनाचे उद्घाटन उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या हस्ते होणार आहे. याप्रसंगी महसूल व गृह राज्यमंत्री योगेश कदम यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. स्वागताध्यक्ष उद्योजक दीपकशेठ गद्रे असून, साहित्यिक कृष्णाजी कुलकर्णी व ग्रंथसखा विश्वस्त श्याम जोशी हे मार्गदर्शन होणार आहे.यावेळी राज्याचे ग्रंथालय संचालक अशोक गाडेकर, कोकण विभागाचे सहा.ग्रंथालय संचालक प्रशांत पाटील,महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाचे कार्याध्यक्ष गुलाबराव पाटील, प्रमुख कार्यवाह सोपानराव पवार, कार्योपाध्यक्ष ग्रंथमित्र राम मेकले, कोषाध्यक्ष भिमराव पाटील, कोकण विभाग ग्रंथालय संघाचे अध्यक्ष दिलीप कोरे,स्थाई समिती सचिव सुनील कुबल, ग्रंथालय कर्मचारी प्रतिनिधी ग्रंथमित्र नंदू बनसोड यांची मंचावर उपस्थिती लाभणार आहे.या सत्राचे प्रास्ताविक रवींद्रकुमार तथा भाई कालेकर हे करणार असून, सूत्रसंचालन अंजली बर्वे व श्रीकांत पाटील हे करतील.

दुपारी १२.३० ते २ या दरम्यान पुरस्कार प्रदान आणि सार्वजनिक ग्रंथालयाची आत्मनिर्भरता या विषयावरचा पहिला परिसंवाद दिलीप कोरे यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. यात ठाणे जिल्हा ग्रंथालय संघाचे अध्यक्ष चांगदेव काळे,ग्रंथ निवड समितीचे माजी सदस्य ग्रंथमित्र कुंडलिक मोरे, नईस खान पठाण नाशिक, अंजली बर्वे रत्नागिरी व अरविंद कुलकर्णी देवरुख हे विचार मांडणार आहेत.

दुपारी ३ ते ४ या वेळात मराठवाडा ग्रंथालय संघाचे अध्यक्ष ग्रंथमित्र खंडेराव सरनाईक यांच्या अध्यक्षतेखाली सार्वजनिक ग्रंथालयाचे संगणकीकरण आणि डिजिटलायझेशन या विषयावर होणाऱ्या परिसंवादात भगवान घेरडे, मनिषा सावंत, संतोष चतुर्भूज हे मार्गदर्शन करणार आहेत.

दुपारी ४ ते सायंकाळी ५ दरम्यान अमरावती विभाग ग्रंथालय संघाचे अध्यक्ष प्रभाकर घुगे यांच्या अध्यक्षतेखाली ग्रंथालयांनी अनुदानाव्यतिरीक्त उत्पादनाची साधने कशी वाढवावीत? या विषयावर चर्चा सत्र होईल. सायंकाळी ५.३० ते ७ या वेळात महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघ, कोकण विभाग ग्रंथालय संघ आणि



रत्नागिरी जिल्हा ग्रंथालय संघाची सर्वसाधारण सभा होणार आहे.रात्री ७ ते ९ या वेळात गायक गुरुदेव नांदगावकर आणि सहकलाकारांचा अभिजात मराठी भावगीतांचा गंध फुलांचा हा सुमधूर कार्यक्रम आयोजिला आहे.

रविवार,दि.२२ फेब्रुवारी नाशिक विभाग ग्रंथालय संघाचे अध्यक्ष दत्ता परदेशी यांच्या अध्यक्षतेखाली रत्नागिरीतील शताब्दी ग्रंथालये या विषयावर परिसंवाद होणार आहे.यामध्ये दिपक पटवर्धन,मधुरा जोशी, अरुण इंगवले,गजानन जोशी,जयंत अभ्यंकर हे विचार व्यक्त करणार असून, समारोप रत्नागिरी जिल्हा ग्रंथालय संघाचे उपाध्यक्ष संभाजी सावंत हे करणार आहेत.

सकाळी ११ ते १ या वेळामध्ये नागपूर विभाग ग्रंथालय संघाचे अध्यक्ष शिवकुमार शर्मा यांच्या अध्यक्षतेखाली ग्रंथालय चळवळीचा मुळाधार- ग्रंथालय सेवक या विषयावर होणाऱ्या परिसंवादात सिंधुदुर्ग जिल्हा ग्रंथालय संघाचे सदस्य संजय शिंदे, रत्नागिरी जिल्हा ग्रंथालय संघाचे संचालक राकेश आंबेकर, कोलगाव मुक्तद्वार ग्रंथालयाचे ग्रंथपाल पूनम नाईक हे विचार व्यक्त करणार आहेत.

दुपारी १ ते ३ दरम्यान या अधिवेशनाचे खुले व समारोप सत्र राज्य ग्रंथालय संघाचे अध्यक्ष डॉ.गजानन कोटेवार यांच्या अध्यक्षतेखाली होणार असून,यावेळी राज्य ग्रंथालय संचालक अशोक गाडेकर,सर्व विभागाचे सहा.ग्रंथाल संचालक अनुक्रमे प्रशांत पाटील,शालिनी इंगोले,डॉ.राजेश पाटील,रामदास साठे, सुनील हुसे,स.र.जोपुळे,रत्नागिरी जिल्हा ग्रंथालय अधिकारी शशांक नाईक, ग्रंथालय निरीक्षक हेमंत काळोखे यांची प्रमुख उपस्थित राहणार आहे.

तेव्हा लातूर जिल्ह्यातील ग्रंथालय चालक,ग्रंथालय कर्मचारी व ग्रंथप्रेमींनी या तिहेरी अधिवेशनाला जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहून ग्रंथालय चळवळी वृध्दींगत करावे असे आवाहन राज्य ग्रंथालय संघाचे राज्या कार्योपाध्यक्ष राम मेकले, लातूर जिल्हा सार्वजनिक ग्रंथालय संघाचे अध्यक्ष ग्रंथमित्र प्रभाकर कापसे,कार्याध्यक्ष डॉ. ब्रिजमोहन झंवर, जिल्हा उपाध्यक्ष ग्रंथमित्र युवराज जाधव, कोषाध्यक्ष राम मोतीपवळे, सहकार्यवार काशिनाथ बोडके, संचालक सर्वश्री हावगी बेरकीळे, सूर्यकांत शिरसे, किरण बाबळसूरे, अशोक खोडवे,श्रीधर स्वामी, जहांगीर सय्यद, नंदकुमार घोगरे, अनिल पाटील,गुप्तलिंग स्वामी, संतोष करमले,काशिनाथ साहू, बाळकृष्ण होळीकर, तुकाराम सुगावकर, बालाजी सूर्यवंशी,गोकर्णा सूर्यवंशी, राजकुमार सोनी, नागनाथ बिरादार, डॉ.अमित म्हेत्रे व रामचंद्र तिरके यांनी केले आहे.

# आमदार प्रा. डॉ. सावंत यांच्या सौजन्याने हुंड्याविना २६ जोडपी विवाहबद्ध



धाराशिव (प्रतिनिधी) समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांच्या जीवनात सन्मान, आनंद आणि आशेचा नवा अध्याय लिहिणारा क्षण म्हणजे मध्यवर्ती सार्वजनिक शिवजयंती महोत्सव समितीच्या 'एक हात मदतीचा' उपक्रमांतर्गत आयोजित मोफत जिल्हास्तरीय बिगर हुंडा सामुदायिक विवाह सोहळा दि. ८ फेब्रुवारी रोजी मोठ्या उत्साहात पार पडला.

धाराशिव शहरातील छायादीप मंगल कार्यालयात सायंकाळी साडेसहा वाजता शाही दिमाखात पार पडलेल्या या विवाहसोहळ्यात एकूण २६ जोडपे विवाह बंधनात अडकली. हुंडा, दिखावा आणि अनावश्यक खर्चाला ठाम फाटा देत सन्मानपूर्वक विवाहाचा आदर्श या उपक्रमातून समाजासमोर मांडण्यात आला. नवदांपत्यांच्या डोळ्यांत आनंदाश्रू तर पालकांच्या चेहऱ्यावर समाधान आणि कृतज्ञतेची भावना स्पष्टपणे दिसून येत होती.

हा सामाजिक बांधिलकीचा उपक्रम राज्याचे माजी मंत्री तथा आमदार प्रा. डॉ. तानाजीराव सावंत यांच्या सौजन्याने यशस्वी झाला. मध्यवर्ती सार्वजनिक शिवजयंती महोत्सव समितीचे अध्यक्ष आकाश कोकाटे यांच्या नेतृत्वाखाली पार पाडण्यात आले. विवाहप्रसंगी वधू-वरांना मणी-मंगळसूत्र, जोडवे, दिवाण, वधू-वरांचे वस्त्र तसेच रूखवत देऊन त्यांच्या संसाराला भक्कम आधार देण्यात आला. यासोबतच वऱ्हाडी मंडळींसाठी भोजनाची उत्तम व्यवस्था करण्यात आली होती. या मंगलप्रसंगी भैरवनाथ शुगरचे व्हाईस चेअरमन केशव सावंत, शिवसेना जिल्हा संपर्क प्रमुख राजन साळवी, सुनील काकडे, भारत इंगळे, अनिल खोचरे, शमशुद्दीन शेख, ड अजित खोत, विनोद गपाट, संजय मुंडे, कुणाल निंबाळकर, पंकज भोसले मध्यवर्ती सार्वजनिक शिवजयंती महोत्सव समितीचे पदाधिकारी, विविध क्षेत्रांतील मान्यवर तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सरनाईकांच्या नियोजनामुळे शिवसेना (शिंदे) ठरली अव्वल महायुतीचा जिल्ह्यात दणदणीत विजय

धाराशिव (प्रतिनिधी) जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीत महायुतीने घवघवीत यश संपादन करत जिल्ह्यात आपली ताकद ठासून सिद्ध केली आहे. या विजयामागे राज्याचे परिवहन मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री सरनाईक यांची प्रताप निर्णायक भूमिका ठळकपणे समोर आली आहे. निवडणूक प्रक्रियेच्या सुरुवातीपासूनच त्यांनी अत्यंत बारकाईने नियोजन करत जिल्ह्यातील प्रत्येक जिल्हा परिषद गट व पंचायत समिती गणात प्रचार सभा घेत शिवसैनिकांमध्ये नवा उत्साह भरण्याचे काम केले.

प्रत्येक सभेतून प्रचार सरनाईक यांनी विकासाचा विश्वास देत जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी तिजोरी कायम खुली ठेवू असा ठाम शब्द दिला. या विश्वासाच्या जोरावर त्यांनी महायुतीच्या उमेदवारांना निवडून देण्याचे आवाहन केले होते. त्याचा सकारात्मक परिणाम थेट निकालातून दिसून आला.



जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचे संपूर्ण नियोजन पालकमंत्री प्रताप सरनाईक यांनी स्वतः लक्ष घालून केले होते. कोणत्या गटात कोणता उमेदवार ? स्थानिक समीकरणे, कार्यकर्त्यांचे मनोबल, प्रचाराची दिशा प्रत्येक बाब अत्यंत सूक्ष्मपणे हाताळली गेली. याच दूरदृष्टीचा आणि राजकीय अनुभवाचा फायदा महायुतीला मिळाला, असे राजकीय जाणकारांचे मत आहे. या निवडणुकीत शिवसेना (शिंदे) ने जिल्हा परिषदेच्या एकूण २३ जागा लढवल्या होत्या. त्यापैकी तब्बल १५ जागांवर विजय मिळवत पक्षाने सुमारे ६५ टक्के स्ट्राईक रेट साधला आहे. हा रेशो इतर सर्व पक्षांच्या तुलनेत अधिक असल्याने शिवसेना (शिंदे) या निवडणुकीत अव्वल ठरली आहे. हा यशाचा आलेख सरनाईक यांच्या नेतृत्वाखाली पक्षाने गाठल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे.

जिल्हा परिषदेच्या ५५ जागांपैकी भाजपने १९ जागांवर विजय मिळवत सर्वात मोठा पक्ष होण्याचा मान मिळवला आहे. एकीकडे महायुतीतील शिवसेना (शिंदे) ला १५, तर राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाला ६ जागा मिळाल्या आहेत. तर दुसरीकडे शिवसेना (ठाकरे) ला ७, काँग्रेसला ३, अपक्षांना ४ आणि समाजवादी पार्टीला १ जागा मिळाली आहे.

एकूण आकडेवारी पाहता जागांचे महायुतीला ४० स्पष्ट बहुमत मिळाले असून जिल्हा परिषदेत सत्ता स्थापन करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. तर उलट महाविकास आघाडीला १० जागांवर समाधान मानावे लागले आहे. त्यामुळे जिल्ह्यातील राजकीय वर्चस्व पुन्हा एकदा महायुतीकडे झुकल्याचे स्पष्ट झाले आहे.

या पार्श्वभूमीवर आता जिल्हा परिषदेचा अध्यक्ष कोण होणार ? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. मात्र, बहुमताच्या बळावर महायुती जिल्ह्याच्या कारभाराची सूत्रे हाती घेणार हे जवळपास निश्चित मानले जात असून, आगामी काळात विकासाच्या दृष्टीने कोणते निर्णय घेतले जाणार ? याबाबतही उत्सुकता वाढली आहे.

# ऊर्जा संवर्धनात उत्कृष्ट कामगिरीबद्दल जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांना राज्य शासनाचा पुरस्कार जाहीर

लातूर, दि. १० - ऊर्जा संवर्धनाच्या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल लातूरच्या जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांना ऊर्जा मंत्रालयाचा 'ऊर्जा संवर्धन पुरस्कार २०२४-२५' जाहीर झाला आहे. जिल्ह्यात वीज बचतीबाबत जनजागृती करणे, शासकीय कार्यालयांमध्ये सौर ऊर्जेचा वापर वाढवणे आणि नाविन्यपूर्ण उपाययोजना राबवण्यात पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हाधिकारी ठाकूर-घुगे यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. त्यांच्या या प्रयत्नांची दखल घेऊन ऊर्जा मंत्रालयाने हा पुरस्कार जाहीर केला आहे. या सन्मानामुळे लातूर जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला आहे.

लातूर जिल्हाधिकारी कार्यालयाने ऊर्जा बचतीसाठी महत्त्वपूर्ण पावले उचलली असून, शाश्वत ऊर्जा वापर, सौर ऊर्जेचा अवलंब आणि कार्यक्षम व्यवस्थापन यावर भर दिला. या कामगिरीसाठी कार्यालयाला ऊर्जा संवर्धन पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. हे प्रशासकीय पातळीवर हरित ऊर्जेचे अनुकरणीय उदाहरण ठरले आहे. एनर्जी ऑडिट २०२२-२३ मध्ये दिलेल्या सर्व सूचनांची जिल्हाधिकारी कार्यालयात अंमलबजावणी करण्यात आली. कार्यक्षम उपकरणांचा वापर, १०० किलोवॅट क्षमतेचा सौर ऊर्जा प्रकल्प, पारंपरिक व अपारंपरिक ऊर्जा साधनांचा समन्वयित, यथोचित आणि काळजीपूर्वक वापर यामुळे दरवर्षी ५५ हजार युनिट्स वीज बचत होत आहे. याशिवाय जिल्ह्यातील शालेय विद्यार्थ्यांना ऊर्जा बचतीचे महत्त्व पटवून देण्यासाठी 'ऊर्जादूत' संकल्पना राबवण्यात आली.

राज्यात उद्योग, अभियांत्रिकी, रसायने, औषधे व अन्न प्रक्रिया, मेटल व स्टील, कागद निर्मिती, तेल व रसायने, वस्त्रोद्योग, थर्मल पॉवर, बांधकाम व्यवसाय, स्थापत्य, शासकीय इमारती आणि सर्वसाधारण क्षेत्रांमध्ये



ऊर्जा संवर्धनासाठी उल्लेखनीय कार्य केलेल्या संस्था व व्यक्तींना गेल्या १८ वर्षांपासून महाऊर्जा (ऊर्जा मंत्रालय) द्वारे ऊर्जा संवर्धन पुरस्कार देण्यात येत आहेत. त्यानुसार 'ऊर्जा संवर्धन आणि व्यवस्थापन उत्कृष्टता-१८' अंतर्गत राज्यस्तरीय पुरस्कार नुकतेच जाहीर करण्यात आले असून, यामध्ये लातूरच्या जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांना 'ऊर्जा संवर्धन पुरस्कार २०२४-२५' जाहीर झाला आहे.राज्य पुरस्कारासाठी निवड झाल्याबद्दल महाऊर्जा पुणे येथील महाव्यवस्थापक समीर घोडके, लातूर विभागीय महाव्यवस्थापक आनंद कुलकर्णी, ऊर्जा ऑडिटर केदार खमितकर आदींनी अभिनंदन व्यक्त केले आहे.

गेल्या तीन वर्षात जिल्ह्याला मिळालेले महत्वाचे पुरस्कार

लातूर जिल्ह्याला गेल्या सुमारे तीन वर्षांत मिळालेला हा आठवा राष्ट्रीय तथा राज्य स्तरावरील पुरस्कार ठरला आहे. यामध्ये राज्य शासनाच्या १५० दिवसांच्या ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमांतर्गत उत्कृष्ट कामगिरीबद्दल पुरस्कार, लोकसत्ता आणि गोखले इन्स्टिट्यूट ऑफ पॉलिटिकल अँड इकॉनॉमिक्सकडून सलग दोन वर्षे प्रथम क्रमांकाचा जिल्हा निर्देशांक पुरस्कार, सशस्त्र सेना ध्वज निधी संकलनामध्ये उत्कृष्ट कामिगीरीबद्दल राज्यस्तरीय पुरस्कार, दिव्यांग मुलांसाठी राबविलेल्या उपक्रमाबाबत स्कॉच अवार्ड, लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ मधील उत्कृष्ट कामगिरीबद्दल उत्कृष्ट निवडणूक निर्णय अधिकारी पुरस्कार, उद्योग क्षेत्रातील कामगिरीबद्दल 'निर्यात पुरस्कार २०२५', मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम अंतर्गत सलग दोन वर्षे पुरस्कार आदी पुरस्कारांचा समावेश आहे.

सौर ऊर्जेद्वारे वीज निर्मितीमध्येही लातूर जिल्हा अग्रेसर मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० अंतर्गत लातूर जिल्ह्यात ६५ प्रकल्प कार्यान्वित झाले असून, त्याद्वारे ३२३ मेगावॅट क्षमतेची वीज निर्मिती होत आहे. तसेच, प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजना अंतर्गत घराच्या छतावर सौर पॅनेल लावून वीज निर्मिती करून वीजबिल शून्य करण्याच्या उद्देशाने लातूर जिल्ह्यातील ११ हजार १२३ लाभार्थ्यांनी घराच्या छतावर सौर पॅनेल बसवले असून, त्याद्वारे ४३.२३ मेगावॅट वीज निर्मिती होत आहे. यामुळे जिल्ह्यात अपारंपरिक ऊर्जेच्या (नवीकरणीय ऊर्जेच्या) वापराला मोठी चालना मिळाली आहे. वीज निर्मितीमध्ये अग्रेसर असलेल्या लातूर जिल्ह्याला आता ऊर्जा संवर्धनासाठी पुरस्कार जाहीर झाला आहे.




# नूतन जिल्हा परिषद सदस्य माणिक गायकवाड यांचा साकोळ ग्रामस्थांकडून जाहिर सत्कार

शिरूर अनंतपाळ - रोजी शिरूर अनंतपाळ तालुक्यातील जिल्हापरिषद व पंचायत समिती निवडणुकीत साकोळ गटातुन राष्ट्रीय कॉंग्रेस पक्ष व स्वाभीमानी शेतकरी संघटनेचे अधिकृत उमेदवार माणिक दौलतराव गायकवाड यांचा निवडणुकीत विजय झाल्यामुळे साकोळ ग्रामस्थांकडून जाहिर सत्कार करण्यात आला.

साकोळ जिल्हापरिषद गटात सर्वाधिक मते घेऊन माणिक गायकवाड यांचा विजय झाल्यामुळे येथील जगत ज्योती महात्मा बस्वेश्वर चौकात राष्ट्रीय कॉंग्रेस पार्टीकडून व स्वाभीमानी शेतकरी संघटना तसेच गावातील नागरीकांकडुन गायकवाड यांचा जाहीर सत्कार करण्यात आला.

यावेळी गावातील प्रतिष्ठित माजी उपसरपंच प्रदीप पाटील , यशवंत पाटील ,मल्लिकार्जुन भूरे, संतोष महाजन,व्यंकट रावळे, भीमाशंकर भालके, शिवशंकर डोंगरे, बबन लुल्ले, चंदर कवठाळे,अशोक कोमारे,महेश लुले,शंकर लुल्ले,विजयकुमार मल्लाडे, अफसर मुल्ला,यशवंत धुमाळे,ईश्वर धुमाळे,काशिनाथ कडेकर आदींसह गावातील प्रतिष्ठित नागरिक मोठ्याप्रमाणात उपस्थित होते.



# शिवछत्रपती शिक्षण संस्थेचे नूतन कार्यकारी मंडळ
## अध्यक्षपदी डॉ. गोपाळराव पाटील, तर बी.बी. ठोंबरे सचिवपदी

लातूर - राज्यातील नामांकित शिक्षणसंस्था असा लौकिक असणाऱ्या शिवछत्रपती शिक्षण संस्थेच्या अध्यक्षपदी माजी खा. डॉ. गोपाळराव पाटील यांची तर उद्योजक बी.बी. ठोंबरे यांची सचिवपदी निवड झाली आहे. संस्थेच्या नुतन कार्यकारी मंडळाची बैठक सोमवारी राजर्षी शाहू महाविद्यालयातील संस्था कार्यालयात झाली. यावेळी उपाध्यक्षपदी डॉ. अजय जाधव तर सहसचिवपदी डॉ. शिवाजीराव सूर्यवंशी तर उद्धवराव पाटील यांची निवड करण्यात आली.

तत्पूर्वी ८ फेब्रुवारी रोजी संस्थेची रीतसर मतदानाद्वारे निवड प्रक्रिया पार पडली. यामध्ये १५ जणांची कार्यकारी मंडळावर निवड झाली असून, त्यात डॉ. गोपाळराव पाटील, बी.बी. ठोंबरे, डॉ. अजय जाधव, डॉ. शिवाजीराव सूर्यवंशी, उद्धवराव पाटील, प्राचार्य रावसाहेब कावळे, सच्चिदानंद पाटील, शिवाजीराव पाटील, विजयाताई पाटील, शुभांगी सूर्यवंशी-काळे, धर्मराज हल्लाळे, शिवाजी भोसले, अमर देशमुख, प्रकाश देशमुख, शामराव पाटील यांचा समावेश आहे.

पदाधिकारी निवडीनंतर संस्थेचे माजी सचिव प्राचार्य अनिरूद्ध जाधव यांनी पदभार नूतन सचिव बी.बी. ठोंबरे यांच्याकडे सुपूर्द करून नवनिर्वाचित कार्यकारी मंडळाचे स्वागत केले. याप्रसंगी अध्यक्ष डॉ. गोपाळराव पाटील व सचिव बी.बी. ठोंबरे यांनी भावना व्यक्त करताना विद्यार्थी हित, शैक्षणिक गुणवत्तेची उज्ज्वल परंपरा कायम राखत शिक्षक, प्राध्यापक, कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन देणारी धोरणे कायम राहतील. संस्थेचा लौकिक वृद्धिंगत होईल, असा विश्वास व्यक्त केला.

# स्वत:ला सिद्ध करणे म्हणजेच नवभारताचे निर्माण : प्रोफेसर डॉ. भारती गोरे



**जयप्रकाश पाटील**

उदगीर प्रतिनिधी - येशील संभाजीराव केंद्रे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात ' हिन्दी भाषेचे नवभारत निर्माणासाठी योगदान ' या विषयावर विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ बाबुराव लहाने ,प्रमुख पाहूणे म्हणुन दिल्ली येथील केंद्रिय विश्वविद्यालयाची वरिष्ठ प्रोफेसर डॉ भारती गोरे, उपस्थित होत्या, या व्याख्यानाचे औचित्य साधुन महाविद्यालयातील विध्यार्थ्यांनी तयार केलेल्या 'साहित्य दर्पण' या भित्तिपत्रकाचे विमोचन करण्यात आले .याप्रसंगी प्रमुख पाहुने म्हणुन बोलताना दिल्ली येथील केंद्रिय विश्वविद्यालयाच्या प्राध्यापिका डॉ भारती गोरे म्हणाल्या,भारत बहुभाषीक,बहुसांस्कृतिक देश आहे, सर्वांना एकासुत्रात बांधण्याची क्षमता भारतीय साहित्यात आहे . भारतीय मातीत वाढलेल्या लेखकानी इथल्या मुल्यावर आधारीत लेखन केले .त्यास भारतीय साहित्य म्हणतात . भारतीय भाषा भिन्न असल्या तरी त्यातील भावना सर्व भारतीयत्वाच्या एकच आहेत. भारतीयानी 'भ' शब्दाला वाचविले पाहिजे . भ- म्हणजे भोजन .भाषा, भेस ,भवन . देशातील भाषा, भवन, भेस व भोजनामुळे नवभारत निर्माण होण्यासाठी वेळ लागणार नाही, नविन शिक्षा पद्धतीमध्ये विज्ञान, मनोविज्ञानाने हिन्दीचे महत्व सिध्द केले आहे . मात्रभाषेत बोलण्याची मानसिकता कमी होताना दिसत आहे, चायनीज भाषाचा खूप प्रभाव पहावयास मिळतो . नवीन राष्ट्रीय शिक्षा क्षेत्रात हिन्दी ढाल बनुन प्रवास करीत आहे. आपल्या भाषेतुनच आपल्याला मनातील भाव , भावना आदान - प्रदान करता येते . भारताची दीर्घकाळ परपंरा तक्षशिला व नालंदा विद्यापीठातून मिळते ज्ञानात रमणारा देश म्हणजे भारत, आपण स्वतःला सिध्द करने म्हणजेच नवभारताचे निर्माण, अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ बी टी लहाने यानी हिंदी भाषेचे महत्व विषद केले . या कार्यक्रमाचे सुत्रबदध सुत्रसंचालन सहयोगी प्राध्यापिका डॉ अल्का सोमवंशी, प्रस्ताविक हिन्दी विभागप्रमुख डॉ विजय कल्लूरकर तर आभार डॉ जितेंद्र शेळके यानी मानले, हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व प्राध्यापक शिक्षकेत्तर कर्मचारी व बहुसंख्य विध्यार्थ्यानी परिश्रम घेतले.



# बारावी परीक्षार्थींचे दयानंद विज्ञानमध्ये गुलाबपुष्प देऊन स्वागत

लातूर : येथील दयानंद शिक्षण संस्था संचलित,दयानंद विज्ञान महाविद्यालयात दि.१० फेब्रुवारी २०२६ रोजी परीक्षेच्या पहिल्या दिवशी १२ वी परीक्षार्थ्यांचे गुलाब पुष्प देऊन स्वागत करण्यात आले.दि.१० फेब्रुवारी ते ११ मार्च २०२६ या दरम्यान होणाऱ्या महाविद्यालयातील परीक्षा मा.जिल्हाधिकारी यांच्या सूचनेनुसार व दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी व सचिव रमेश बियाणी यांच्या मार्गदर्शनानुसार कॉपीमुक्त व भयमुक्त पद्धतीने सुरळीतपणे सुरू झालेल्या आहेत.

महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे व उपप्राचार्य प्रा.भाऊसाहेब सरवदे व इतर मान्यवरांनी परीक्षार्थींना गुलाबपुष्प देऊन त्यांचे मनोबल वाढविले.तसेच परीक्षा यशस्वीतेसाठी पर्यवेक्षिका डॉ. संध्या कोल्हे,पर्यवेक्षक डॉ. हेमंत वरुडकर,सेल्फ फायनान्सचे प्राचार्यअनिलकुमार माळी,परीक्षा विभाग प्रमुख व परीक्षा केंद्र संचालक प्रा.विजयकुमार मांदळे, प्रा.बळवंत सूर्यवंशी,प्रा.भालचंद्र कोयलवार, डॉ.कोमल गोमारे,प्रा.एस.डी.राठोड, महेंद्र कोराळे,प्रा.जीवन जाधव, प्रा.शैलेश सूर्यवंशी, डी.एम. राठोड,नरसिंग जाधव यांच्यासह इतर प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे मोलाचे सहकार्य लाभत आहे.परीक्षा केंद्रावर चोख बंदोबस्त व बैठे पथक आहे.परीक्षेचे उत्तमरित्या नियोजन करण्यात आलेले आहे आणि विद्यार्थी भयमुक्त व कॉपीमुक्त परीक्षा देत आहेत.

# शिवजन्मोत्सव २०२६ संभाजी ब्रिगेड च्या वतीने व्याख्यान व गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**(जयप्रकाश पाटील)**

उदगीर प्रतिनिधी- दिनांक १२ फेब्रुवारी २०२६ गुरुवार रोजी शिवजन्मोत्सव २०२६ संभाजी ब्रिगेड कार्यकारणी लातूर व उदगीर च्या वतीने व्याख्यान व गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात येणार आहे. स्वराज्याच्या संस्थापक कुळवाडी भूषण छत्रपती शिवाजी महाराज यांनी स्वातंत्र व सार्वभौम राज्य निर्माण करण्यासाठी व बहुजन समाजाला तत्कालीन जुलमी राजवटीच्या जोखडातून व गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी आपले संबंध आयुष्य वेचले अशा मानवतावादी राजाचा जन्मदिन या प्रतिवर्षीप्रमाणे शिवम उत्सव म्हणून साजरा करीत आहोत. छत्रपती शिवरायांच्या जन्मोत्सवानिमित्त संभाजी ब्रिगेडचे कार्यकारणी लातूर व उदगीर च्या वतीने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे. यात व्याख्यान, शिवव्याख्याते, शिवमती रंजना श्रीकांत हासुरे. विषय: आहे शिवराय आणि आजची प्रेरणा .आणि गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात येणार आहे .तरी या कार्यक्रमास हजारोच्या संख्येने जनतेने उपस्थित राहावे असे आव्हान संभाजी ब्रिगेड च्या वतीने करण्यात येत आहे.



या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती मा. श्री सुशांतजी शिंदे उपजिल्हाधिकारी उदगीर, मा. श्री राम बोरगावकर तहसीलदार उदगीर, मा. श्री गजानन भातलवंडे उपविभागीय पोलीस अधिकारी उदगीर, मा. श्री राजकुमार पुजारी पोलीस निरीक्षक निरीक्षक उदगीर ग्रामीण, मा. श्री दिलीप गाडे शहर पोलीस निरीक्षक उदगीर, मा. श्री सोमनाथ जाधव नगरपरिषद मुख्याधिकारी उदगीर, मा. प्रा शिवराज मोटेगावकर आर सी सी लातूर, मा. श्री रोहन जाधव जिल्हाध्यक्ष सेवा संघ लातूर, मा. श्री राजकुमार माने जिल्हाध्यक्ष संभाजी ब्रिगेड लातूर, मा. श्री लिंबराज सूर्यवंशी सेवा संघ लातूर, मा. श्री संकेत पाटील संपर्कप्रमुख लातूर, मा. श्री विवेक सुकणे जिल्हा उपाध्यक्ष सेवा संघ लातूर, मा. अनिताताई जाधव जिल्हा अध्यक्ष जिजाऊ ब्रिगेड, मा. सौ अनितातााई जगताप जिल्हा सचिव जिजाऊ ब्रिगेड, मा. सौ. पुष्पाताई जाधव तालुका अध्यक्ष जिजाऊ ब्रिगेड, मा. अंजुम खादरी अध्यक्ष विद्रोही साहित्य संमेलन, आपले विनीत; संभाजी ब्रिगेड शिवश्री राजकुमार भालेराव तालुका अध्यक्ष उदगीर, शिवश्री उत्तम फड संभाजी ब्रिगेड जिल्हा उपाध्यक्ष व पत्रकार, जिल्हा सचिव शिवश्री मोहनेश्वर विश्वकर्मा, कार्याध्यक्ष शिवश्री श्रीधर जाधव,शिवश्री बाळासाहेब चिंचोलकर, संघटक शिवश्री महेबूब सय्यद,शिवश्री राम रावणगावे,शिवश्री विधानसभा अध्यक्ष पुंडलिक नागरगोजे, विधानसभा उपाध्यक्ष शिवश्री जनार्दन फड, वकील अध्यक्ष शिवश्री कृष्णकांत आमगे, तालुका उपाध्यक्ष शिवश्री धम्मसागर सोमवंशी, तालुका सचिव शिवश्री सावंत तोरणेकर, शहराध्यक्ष शिवश्री बालाजी रोड सर, तालुका अध्यक्ष शिवश्री कालिदास सोमवंशी, शिवश्री सतीश पाटील मानकीकर, तालुका सेवा संघ अध्यक्षशिवश्री प्रदीप ढगे, हृदयरोग तज्ञ डॉ. योगेश बिरादार, तालुका कार्याध्यक्ष नरसींग बनशेळकीकर, नामवंत डॉक्टर व प्रतिष्ठित नागरिक उपस्थित राहणार आहेत. तरी लोकांनी या कार्यक्रमाचा जास्तीत जास्तअवश्य लाभ घ्यावा असे संभाजी ब्रिगेडच्या वतीने विनंती करण्यात येत आहे. दिनांक १२ फेब्रुवारी २०२६ वार गुरुवार, वेळ ४.०० वाजता .ठिकाण आहे नगरपरिषद समोरील मैदान संभाजी ब्रिगेडच्या वतीने कळविण्यात येत आहे. या कार्यक्रमाला वेळेवर हजर व्हावे, असे संभाजी ब्रिगेडच्या वतीने करण्यात आलेले आहे.



# सलाम मुंबई फाउंडेशनच्या राष्ट्रीय बाल परिषदेत पांडुरंग विद्यालयाचे यश

**जयप्रकाश पाटील**

उदगीर, प्रतिनिधी- सलाम मुंबई फाउंडेशनच्या पुढाकारातून सहावी राष्ट्रीय बाल परिषद दिनांक ६ फेब्रुवारी २०२६ रोजी ऑनलाईन पद्धतीने यशस्वीरीत्या पार पडली. सदृढ आणि सक्षम भारतासाठी युवकांचे नेतृत्व या संकल्पनेवर आधारित ही परिषद झूम व यूट्यूब माध्यमातून आयोजित करण्यात आली होती. महाराष्ट्र, राजस्थान, कर्नाटक, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, गुजरात, पश्चिम बंगाल, उत्तराखंड, छत्तीसगड व हिमाचल प्रदेश या दहा राज्यांतील ग्रामीण व दुर्गम भागातील किशोरवयीन विद्यार्थी, शिक्षक, सार्वजनिक आरोग्य तज्ञ तसेच शासकीय प्रतिनिधी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. या परिषदेत एकूण १ लाख ६१ हजार विद्यार्थी व भागधारकांचा सहभाग नोंदविण्यात आला. विद्यार्थ्यांचे विचार व अनुभव जाणून घेण्यासाठी तसेच मार्गदर्शनासाठी डॉ. प्राची राठी, डॉ. सुमन नेगी आणि मा. प्रीती चौधरी यांनी मार्गदर्शन केले. परिषदेत तंबाखू नियंत्रण, पोषण, मानसिक आरोग्य, स्वच्छता, सुरक्षित शालेय वातावरण आणि जीवन कौशल्य या आरोग्य व शिक्षणाशी संबंधित महत्त्वाच्या विषयांवर विशेष भर देण्यात आला असून किशोरवयीन विद्यार्थ्यांना आपले विचार मांडण्यासाठी सक्षम करणे व शाळा-समुदाय पातळीवर सकारात्मक वर्तनात्मक बदल घडविणे हा मुख्य उद्देश होता. महाराष्ट्रातील नऊ शाळा त्यात लातूर जिल्ह्यातील दोन शाळांचा विशेष सहभाग होता. या राष्ट्रीय बाल परिषदेत श्री पांडुरंग विद्यालय, कल्लूर येथील इयत्ता सातवीतील विद्यार्थिनी सृष्टी मारुती श्रीमंगले हिने प्लास्टिकमुक्तीच्या समस्येवर प्रभावी कार्य केले. तिच्या कामगिरीबद्दल सलाम मुंबई फाउंडेशनच्या लातूर व नागपूर विभागाच्या समन्वयक दीप्तिशा शिंदे यांनी विद्यालयास भेट देऊन सृष्टीसह अक्षरा अण्णाराव कांबळे (इ.९ वी), योगेश मारुती श्रीमंगले (इ.९ वी), शेख सुफियान मकसूद (इ.८ वी) आणि पठाण निदा अहमद (इ.८ वी) या सहभागी विद्यार्थ्यांचा आणि राष्ट्रियबाल परिषदेचे समन्वयक चंद्रदीप बालाजी नादरगे यांचा सत्कार करून बक्षिसे प्रदान केली. या प्रसंगी संस्थेचे सचिव विनायकरावजी बेंबडे,सलाम मुंबई फाउंडेशनच्या लातूर व नागपूर जिल्ह्याचे समन्वयक दिप्तिशा शिंदे, मुख्याध्यापक एस. व्ही. नादरगे, तसेच शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सामाजिक संसाराची कहाणी म्हणजे 'समिधा'-धनंजय गुडसूरकर

## बाबा आमटे स्मृतिदिनी व्याख्यान

**पाटील जयप्रकाश**

उदगीर / प्रतिनिधी - सामाजिक संसाराची कहाणी म्हणजे साधना आमटे यांचे 'समिधा' हे आत्मकथन आहे, असे प्रतिपादन जेष्ठ साहित्यिक धनंजय गुडसूरकर यांनी केले.



श्रमर्षी बाबा आमटे यांच्या स्मृतिदिनाचे औचित्य साधून संस्कारभारती देवगिरी प्रांताच्या वतीने आयोजित व्याख्यानात त्यांनी 'समिधा'या ग्रंथावर संवाद साधला. अध्यक्षस्थानी अभय शृंगारपुरे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून ॲड.संजय घायाळ, बाबा आमटे यांच्या नात आरती आमटे-नानकर, प्रांतअध्यक्ष प्रा. स्नेहल पाठक, महामंत्री प्रा. जगदीश देशमुख, प्रकल्पप्रमुख प्रा. डॉ. विज्ञासागर पाटांगणकर, संरक्षक भरतअण्णा लोळगे उपास्थित होते. मृणाल कुलकर्णी यांनी ध्येयगीत सादर केले.

पिढीजात वैभववार पाणी सोडून स्वयंप्रेरणेतून स्वीकारलेली फकिरी व त्याच भावेनातून साधनाताईनी केलेल्या समर्पणातून नवनवे प्रकल्प उभे राहिले, जगणे असह्य झालेल्या वंचिताना आत्मभान व जगण्याचा मार्ग सापडला, आकांक्षेची आकाशयात्रा व समर्पणची सिद्धता याचे दर्शन या कलाकृतीतून होते असे गुडसूरकर पुढे बोलताना म्हणाले. सहजीवनाच्या या साहसकथेतून वर्तमानाने प्रेरणा घेण्याची गरज आहे, समृद्ध जगण्याची ही कहाणी कायमच दिशादर्शक आहे असे मत गुडसूरकर यांनी पुढे बोलताना व्यक्त केले. बाबा आणि साधनाताईचे जगणे म्हणजे असिधारा व्रत होते, आनंदवनाने निर्माण केलेला आनंद हा चमत्कार वाटावा इतका मोठा आहे, त्यांच्या नोबेल कार्याचा वारसा पुढे चालवीता येणे हे आनंददाई असल्याचे आरती आमटे म्हणाल्या. समाजकार्य ही साधनाच असून पिचलेल्यासाठी कार्य करताना स्वसुखाचा त्याग करणारी माणसे महान असतात असे मत ऍड. संजय घायाळ (संभाजीनगर )यांनी यावेळी बोलताना व्यक्त केले. प्रा. स्नेहल पाठक यांनी आमटे परिवाराचे कार्य हे महान मानवतवादी कार्य असल्याचे सांगितले. जनार्धन तळीखेडे यांनी सूत्रसंचालन तर डॉ. विद्यासागर पाटांगणकर यांनी आभार मानले.